# चैतन्य लहरी

अंक क्र. १, २

जानेवारी–फेब्रुवारी २००२



तुम्ही जेव्हा जबाबदारीने व खऱ्या अर्थाने सहजयोग करता तेव्हांच
तुम्हाला देवीचा प्रसाद व चैतन्य लाभते.
ख्रिसमस पूजा २००२




गणपतीपुळे २००१




# अनुक्रमणिका

सहजमय जग, सहजीयांचा धर्म... ........ २

संक्रांत पूजा - मुंबई, १४ जानेवारी २००२ ........ ३

ख्रिसमस पुजा - गणपतीपुळे, २५ डिसेंबर २००१ ........ ४

कळवा पुजा - कळवा, ३१ डिसेंबर २००१ ........ ८

गणपतीपुळे सेमिनार वृत्तांत ........ १०

अमृत वाणी ........ १५

दहा गुरुंची अवतरणे - कन्फूशियस ........ १७

दिवाळी पुजा - लॉसएन्जिलिस, १८ नोव्हेंबर २००१ ........ १८

सहजसमाचार ........ २२



# सहजमय जग, सहजीयांचा धर्म

समस्त मानवजातीचे जागरण व आंतरिक परिवर्तन घडवून आणण्यासाठीं प.पू. श्रीमाताजींनी तीस वर्षांपूर्वी लावलेला सहजयोगाचा वेल आता बहरला आहे व जगभरामधील अनेक देशांमध्यें त्याच्या फुलांचा दरवळ पसरत आहे. त्यासाठीं त्यांनी घेतलेले अपरंपार कष्ट व मेहनत आपण जाणतो. श्रीमाताजींचे ध्येय व स्वप्न साकार होण्याचा व सहजयोगाचे बीज जगभरांत ठिकठिकाणी रुजवण्याचा हा समय आहे. अशी वेळ पुन्हां येणार नाहीं. म्हणूनच सहजयोगाचा प्रचार व प्रसार करण्याबद्दल त्यांनी वारंवार उपदेश केला आहे. अलिकडच्या प्रत्येक प्रवचनांमध्यें व पूजा-सोहळ्यांमध्यें त्यांनी ही तळमळ पोटतिडकेने व्यक्त केली आहे.

आपण सर्व सहजयोगी त्यांच्या या कार्याचे हातपाय आहोत, उपकरणे आहोत व परमचैतन्याचे वाहक आहोत याचे भान आपण विसरणे अक्षम्य आहे. आपल्याला सहजयोग मिळाला व आपले सर्व कांही ठीक झाले एवढ्यावरच संतुष्ट राहून चालणार नाहीं. तसे झाले तर आपण सहजयोग घेऊनही कांहीच मिळवले नाही असे होईल. श्रीमाताजींच्या आपल्याकडून काय अपेक्षा आहेत व आपण काय केल्यावर त्या प्रसन्न होतील याचे जागृत भान अखंडपणें बाळगणे व त्यानुसार कार्य करणे यांतच सूज्ञता आहे; तीच आपली जबाबदारी व एकमेव कर्तव्य आहे. त्यांत आपण कमी पडलो तर आपला सहजयोग व्यर्थ गेल्यासारखा होईल.

आजकाल जगामध्यें सर्वत्र प्रचंड स्थित्यंतरे घडत आहेत; जीवनाच्या सर्व क्षेत्रात वेगवान बदल घडत आहेत. दुर्जनशक्ति संघटित होत आहे व सज्जनशक्तीचा आवाज क्षीण होत आहे. या सर्व भ्रान्तीमध्यें माणूस कुठल्या टोकाला जाईल ही शंका वाटूं लागली आहे. पण हे सर्व सजीवसृष्टीच्या मागे असलेल्या दिव्य चेतनेवर आलेलं मळभ आहे, आणि माणूस आपल्याच अंतर्यामी असलेल्या आत्मचेतनेला व त्याच्या ईश्वरी प्रेरणेला सामोरा, सन्मुख झाल्यावर ही परिस्थिति बदलायला वेळ लागणार नाहीं. उत्तरेकडील पक्षांना थंडीची चाहूल जशी उपजत बुध्दीने लागते तशी आपल्यामधील सुप्त देवपणाची चाहूल मानवजातीला लागणे आवश्यक आहे व त्यासाठीच आदिशक्तिने अवतार धारण केला आहे. त्यासाठीं सहजयोगामधून आत्मसाक्षात्कार मिळवण्याशिवाय अन्य तरणोपाय नाही. म्हणूनच सहजयोगाचे कार्य जोमाने व निष्ठेने करुन अधिकाधिक लोकांना जागृति देण्याबद्दल श्रीमाताजी जीव तोडून आपणासर्वांना सांगत आहेत.

सहजयोगाच्या प्रसार कार्याला वाहून घेणें हाच आतां सहजयोग्यांचा धर्म व्हायला हवा. श्रीमाताजींनी आपल्या सर्वांसमोर ठेवलेल्या आव्हानाला सामोरे जाण्यास आपण सर्वजण सिध्द होऊ या. हा जगन्नाथाचा रथ ओढण्याची सर्व शक्ति त्याच पुरवणार आहेत; हे सर्व विधिलिखित त्याच जाणतात. संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे 'सहजमय जग सहजीयांचा धर्म' ही भावना मनोमन उराशी बाळगून आपण सर्वजण कार्यरत होऊ या.

# संक्रांत पुजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचा संदेश
मुंबई, १४ जानेवारी २००२



## परमपूज्य श्री माताजींचे मकरसंक्रांतिनिमित्त पूजन व त्यांचा मकर संक्रांतीनिमित्त संदेश

मकरसंक्रांत म्हणजे संक्रमण. काहीतरी बदल होण्याचा दिवस. या दिवशी सूर्याचे उत्तरायण सुरु होते. आपल्या भारतात सर्व सण चंद्राच्या स्थितीवर अवलंबून आहेत, म्हणून त्या बदलत असतात. पण मकरसंक्रांतीचा दिवस सूर्य स्थितीवर असल्याने हा दिवस नेहमी १४ जानेवारीस येतो.

संक्रांतीचा संकेत म्हणजे आजपासून सूर्याची उष्णता वाढत जाणार. सूर्याची उष्णता मानवजातीस हितकारक आहे. त्याच्यामुळे आपले बोलणे चालणे होते. सुर्याच्या उष्णतेने माणूस राग-राग करतो. म्हणून ह्या दिवशी गोड खाऊन गोड बोलण्यास हवे.

सूर्याच्या उष्णतेने पृथ्वीवर धन, धान्य, फ़ळे अर्पण करुण देवीचा आशिर्वाद घेतात. आदिशक्तीच्या आशिर्वादाने पृथ्वीतत्व शांत होते व मानवजात उन्नत होते.

संक्रांतीच्या सणास सांस्कृतिक महत्व आहे.भारतात हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. इतर देशात पण हा साजरा होतो. पण भारतात ह्याचे फ़ार महत्व आहे. भारतात जास्त थंडी नाही, फ़ार गरम नाही; संतुलित स्थिति आहे, ही भारतावर आदिशक्तीची कृपा आहे. इतर देशात संतुलन नाही. अति थंड किंवा अति उष्ण अशी स्थिति आहे.

निसर्ग बदलला म्हणून आपण बदलणे योग्य नव्हे. सूर्याच्या उष्णतेमुळे आपण राग-राग करणे योग्य नाही. राग करणे चुकीचे आहे. षड्रिपू मध्ये राग हा सर्वात खराब आहे. आपण सहजयोगी आहात, जागृत आहात, कुंडलिनीचे जागरण झाले आहे, शांत रहावयास शिकले पाहिजे. तसे बरेच सहजयोगी छान आहेत. चांगले उन्नत आहेत. काही साधारण एक टक्का लोक अलक्ष्मीच्या पाठी लागले आहेत. त्याचा राग येणे स्वाभाविक आहे. त्यांना सुधारणे हे तुमचे काम नाहीं ते काम आदिशक्तीचे आहे. तुम्ही शांत राहून प्रगति करावयास हवी. सर्व काही परमात्म्याच्या कृपेत होते ह्याचे सदैव भान हवे. काही लोक खराब असतील, पैसा सर्व काही मानत असतील; अशा लोकांचा सहजयोगात उपयोग नाही. पण त्याचा इलाज तुमच्यापाशी नाही. आदिशक्ति बघुन घेईल.

अमेरिकेचे अध्यक्ष श्री बुशसाहेब मला मानतात, मी त्यांना नुकतेच पत्र पाठविले व ताबडतोब स्थिति बदलली. जनरल मुशर्रफ़ ह्यांच्यात बदल झाला व त्या जनरल मुशर्रफने मी श्री बुशना लिहील्याप्रमाणे आपल्या देशास व इस्लाम ह्याला संबोधून भाषण केले ते सर्व माझ्या पत्रातील मजकूराप्रमाणे.

तुम्ही सुध्दा अशा गोष्टी हाताळू शकता; पण सूक्ष्मात व चैतन्य स्थितीमधें राहावयास हवे. आध्यामिक जाणिव पाहिजे. आपण कोणतीही इच्छा धरणे योग्य नाही.नीरिच्छ असावयास हवे. सहजयोग्यांनी अजून फार पुढे जावयाचे आहे. अनेक उपक्रम अजून व्हावयाचे आहेत. सर्व काही परमात्मा पुरे करणार आहे. चिंता न करता शांत रहावयास हवे.

संक्रांत म्हणजे सूर्य शक्ति, आणि सूर्य शक्ति म्हणजे विश्वास. सूर्य म्हणजे उष्णता, तेज. ती उष्णता घेऊन जळून जाणार की तेज घेऊन विश्वासाने तेजस्वी होणार हे आपल्यावरती आहे.

सर्वांना अनंत आशीर्वाद



# ख्रिसमस पुजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण
गणपतीपुळे, २५ डिसेंबर २००१

आज पूजेसाठीं इथें इतके सहजयोगी जमल्याचे पाहून मला फार आनंद होत आहे. आता ख्रिश्चन लोक जगभर पसरल्याचे दिसून येते आणि आपण ख्रिस्तांचे अनुकरण करतो असे ते अभिमानानें सांगतात. प्रत्यक्षात ते या बाबतीत काय करतात मला माहीत नाही. येशू ख्रिस्त मूर्तिमंत परचैतन्य होते, साक्षात् ओंकार होते म्हणून सुळावर दिल्यावरही स्वत:चे पुनरुत्थान करु शकले. अर्थात त्यांचे अनुयायीही उच्च स्तरावर आलेले मानव असले पाहिजेत. पण सर्व धर्मांचा इतिहास पाहिल्यास हेच दिसून येते की काळाच्या प्रवाहांत धर्म-धर्म करता करता लोक धर्माचे मूळ तत्त्व विसरुन बरोबर विरुध्द दिशेकडे भरकटत जातात. ख्रिस्तांच्या जीवनाचे सार म्हणजे निरासक्तता व त्याग; निरासक्त माणूस अखंड समाधानात असतो; आपल्या समस्त जीवनाकडे एक नाटक म्हणून पहात असतो. त्यांच्यासारखे एवढे अलौकिक अवतरण पृथ्वीतलावर आले, पण नंतरच्या लोकांनी धर्माच्या नांवाखाली लढाया केल्या, विकृत स्वरुपांत स्तोम माजवले; त्याचा अतिरेक झाल्याचे आतां काही जणांना कळू लागले आहे. ख्रिस्तांनी सत्याचा आग्रह धरला पण ख्रिश्चन लोकांनाच सत्य म्हणजे काय हे समजले नाही. 'मी आत्मा आहे' हे जाणणे व आत्मस्वरुप होणे म्हणजे सत्य. पण लोक त्यांनी काय सांगितले व आपण काय मिळवले पाहिजे हे विसरले. मोठमोठ्या संतपुरुषांनी माणसांना ऊन्नति साधण्याचा उपदेश केला; पण लोकांचा मूर्खपणा सुटत कसा नाही हे मला समजत नाही. ख्रिश्चन धर्मातील अधिकारी माणसेही पैशाच्या मागे लागलेले आढळून येतात; त्यांना सत्याचा विसर पडलेला असतो. हे सर्व धर्मालाच सुळावर चढवण्यासारखे आहे असेच मला वाटते. त्या जाणकार म्हणवणाऱ्या लोकांच्या जीवनांत धर्म म्हणून कांही आहे असे दिसतच नाहीं. सत्याचा इतका उपमर्द ते कसे करु शकतात आणि त्याचा नुसता बडेजाव कसा करतात मला समजतच नाहीं.ख्रिस्तांच्या नावावर नुसते कर्मकांण्ड चालवण्यांतच ते दंग असतात. हे सर्व चुकीचे आहे व त्यामुळें नुकसानच होणार आहे हे समजूनही सत्याच्या बाबतीत हा ढोंगीपणा लोक मान्य करतात हे न समजण्यासारखे आहे. हिंदू, मुस्लिम, ख्रिचन इ.कुठलाही धर्म बघितला तरी हाच प्रकार आढळतो.

**अधिकाधिक लोकांना आज्ञाचक्राच्या पार पोचवण्याचे काय करणें हिच ख्रिस्तांना सहजयोग्यांची आदरांजली.**

मोहम्मदसाहेबांनी दोनच गोष्टी सांगितल्या; एक म्हणजे 'मिराज', त्याचा अर्थ कुंडलिनीचे जागरण हाच आहे; दुसरा शब्द 'जिहाद' म्हणजे स्वत:मधील सर्व दोष व चुकीच्या हीन प्रवृत्तींचे निर्दालन; स्वत:ला ठार मारणे किंवा आत्महत्या करणें असा याचा मुळीच अर्थ नाहीं, त्यासाठी मुस्लिम बनण्याची मुळींच जरुरी नाहीं. त्यामुळे स्वर्गात प्रवेश मिळणार आहे असे सांगण्यांत कांही अर्थ आहे का? निरापराध लोकांचा जीव घेण्यांत कसला आनंद असणार नाहीं. स्वत:ला विद्वान म्हणवणाऱ्या मौलाना लोकांनीही आतां खर ज्ञान मिळवले पाहिजे; त्यांना स्वत:बद्दल जगामधे काय स्थान आहे व आपली लायकी काय आहे याची खरी कल्पना नाही. कांही थोडेफार जाणकार आहेत पण बरेच जण सत्तेच्या मागे लागले आहेत. हे सर्व

प्रकार म्हणजे देवाच्या वा अध्यात्म्याच्या नावाखाली चाललेला मूर्खपणा आहे.

आपले कर्तव्य हेच आहे की, त्यांना सत्य नीट समजावून सांगणें व त्यांना अध्यात्मिक जीवनाच्या सन्मार्गावर आणणे. हिंदु, ख्रिश्चन, मुस्लिम इ. सर्व धर्माचे लोक पहा. ते खरी धार्मिकता पूर्णपणे विसरुन गेले आहेत. ख्रिस्त शेवटी सुळावर चढले; याचा अर्थ लोकांना खरे सत्य नकोच होते. सॉक्रेटिसलाही शेवटी जहर प्यावे लागले. याप्रमाणें आजपर्यंत जे जे कोणी सत्य समजावून सांगत आले त्यांचा छळच केला गेला व त्यातच त्यांचा अंत झाला. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे अनुयायी म्हणवणाऱ्या लोकांना स्वत:साठी सत्ता मिळवण्यापुरता धर्म हवा होता. कुंडलिनी जागृत होऊच शकत नाहीं असेही म्हणायला त्यांनी कमी केले नाही. पण तुम्हा सर्वांना त्याची अनुभूती मिळाली आहे; चैतन्यलहरी तुम्ही जाणल्या आहेत. कुराणातही त्याचे वर्णन केलेले आहे; पण मुस्लिम लोकांना हे कोण सांगणार? आजकालच्या सुधारलेल्या जगामधें धर्माच्या मर्यादाच मुळी नाहीशा झाल्या आहेत. अमेरिकेत मला दिसते की नीतिमत्ता हा शब्दच त्या लोकांनी पुसून टाकला आहे; त्यांना नीतीची चाडच उरलेली नाही; पैसा मिळवीण्याच्या वेडापायी तिथे नीतिमत्तेचा बाजार मांडला गेला आहे. मुस्लिम धर्मातील 'वहाबी' पंथाचे लोक नितीमत्ता बिघडण्याची सारी जबाबदारी महिलांवर टाकतात आणि त्यासाठी महिलांवर बुरखा वापरण्याची सक्ति करतात. उत्तर भारतातही ही प्रवृत्ति आजकाल वाढली आहे, तिथे स्त्रियांना फार हीन वागणूक मिळते आणि त्यांची स्थिति फार हालाखीची आहे. दक्षिण भारततही या बाबतीत फार कर्मकाण्डीपणा चालतो आणि त्याची जबरदस्ती महिलांवर गाजवली जाते. उदा. केस पूर्णपणें काढून महिलांना मंदिराभोवती प्रदक्षिणा करायला लावणें, पतीच्या निधनानंतर केशवपन करण्याची सक्ति इ. आतां हिंदु समाजात सुधारणा होऊन या प्रथा बंद पडत आहेत. पण मुस्लिम समाजांत अशा सुधारणा होणे अशक्य आहे; त्यांच्या महिलांबद्दलच्या धारणाच इतक्या विकृत टोकाच्या आहेत की त्यांत बदल असंभवनीय आहे. मी निराधार, परित्यक्त स्त्रियांसाठी सेवाश्रम सुरु केला तेव्हां त्यांत आलेल्या महिलांमधे बहुसंख्य महिला मुसलमान होत्या. वर प्रत्येकीला आठ-दहा मुले. वृंदावनमधे विधवा हिंदु महिलाश्रमातील स्त्रियांना मंदिरांत भजने म्हणण्यासाठीच बसवल्याचे व दिवसाकाठीं फक्त एक रुपया मिळत असल्याचेही मी पाहिले आहे. धर्मामधे जर अशा अनिष्ट प्रथा असतील तर धर्मच नसलेला बरा असे हे प्रकार आहेत.

जे लोक धर्माची शिकवण देत असतात ते स्वत: उच्च स्थितीचे असले पाहिजेत. सहजयोगांत आल्यावर तुमच्या या सर्व चुकीच्या धारणा व कल्पना सुटतात वा संपतात. हे सर्व चिखलासारखे आहे व ते थांबवले नाहीं तर आपणच चिखलात गाडले जाऊ हे तुम्हाला समजते. ख्रिश्चन लोकांतही अशा अनेक चुकीच्या प्रथा आहेत. बालकाचा जन्म असो किंवा मृत व्यक्तीचे दफन असो, दोन्ही प्रसंग शॅंपेन पिऊन साजरे केले जातात, ख्रिस्तांनीही दारु पिण्यास मनाई केली नव्हती, उलट एका लग्नप्रसंगांत पाण्यात बोटे बुडवून त्याची दारु बनवून त्यांनी सर्वांना वाटली अशा धादांत खोट्या कथाही पसरवल्या गेल्या. खरे तर त्यांनी पाण्यापासून द्राक्षासव बनवले. दारुचे सेवन केल्यामुळे माणसाची चेतनाच खराब होते म्हणून सहजयोगात मद्यसेवनास मनाई आहे.मद्यसेवनास हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन इ.सर्व धर्मामधेही परवानगी नाहीं. ख्रिस्त नेहमी लोकांना शुध्द व स्वच्छ होण्याचा (निर्मल-तत्त्व) आग्रह करत. निर्मल-तत्त्वामधें उतरल्यावरच तुम्ही शुध्द होणार व त्यानंतरच सुख, समाधान व आनंद यांची प्राप्ति होणार आहे. तेव्हांच तुम्हाला प्रकाश मिळतो. तोपर्यंत माणूस अज्ञानाच्या अंधारातच राहणार; तुम्ही हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन कांहीही असा, तुम्हाला इतर कशानेही सत्याचा प्रकाश मिळणार नाहीं. पण हा प्रकाश मिळाल्यावर तुम्हाला तो इतरांना वाटायचा आहे, इतरांमधेही परिवर्तन घडवून आणायचे आहे; त्यासाठी तुम्हाला खूप कष्ट व मेहनत केली पाहिजे. मी तर पाहिले आहे की जे लोक असे खूप कार्य करतात ते इतकें नम्र होऊन जातात की मलाच आश्चर्य वाटते. त्यांना इतके चांगले कार्य करणें व यश मिळणें कसे शक्य झाले हे मलाही कधीकधीं समजेनासे होते. अर्थात त्यातही कांहीजण पैशाच्या वा अधिकाराच्या व सत्तेच्या मागे लागणारे आहेत, पण त्यापासून आनंद व समाधान मिळत नसते. खरा आनंद आपल्या अंतरंगात प्रकाश आल्यावरच मिळतो. तुम्हा सर्वांना हा अनुभव

आला आहेच, पण म्हणूनच तो आपल्या स्वतःपुरताच न ठेवता इतरांनाही तो मिळवून दिला पाहिजे. जास्तीत जास्त लोकांना तो कसा द्यायचा याचा ध्यास तुम्ही घेतला पाहिजे.

सहजयोगांत आल्यावर आपण जीवनाबद्दलच्या आजपर्यंतच्या सर्व चुकीच्या धारणा, फालतू गोष्टी इ. टाकून दिल्या आहेत का हे नीट लक्षांत घेणें जरुरीचे आहे. तसे घडले नाहीं तर तुम्हालाच त्रास होईल. सहजयोगांत तुम्हाला अनेक आशीर्वाद मिळतात. अमेरिकेंत नुकत्याच घडलेल्या दहशतवादी हल्यांमधें ३०० सहजयोगी त्याच ठिकाणी कामावर होते पण सर्वच्या सर्व वाचले; कुणाला कसलीही दुखापत वा इजा झाली नाहीं. या भयानक घातपात करणाऱ्या सैतानी लोकांचाही सर्वनाश होणार आहे. म्हणूनच मी त्यावेळीं अमरिकेला गेले होते; दिवाळीच्या आधीं हे युध्द संपणार आहे असे मी त्यावेळीं म्हटले होते आणि तसेच घडून आले आहे. परमेश्वरानें निर्माण केलेल्या सृष्टीचा संहार करणारे हे कोण? जगामधे सर्वत्र घातपात करण्याचा त्यांना काय अधिकार आहे? माणसांचा हा मूर्खपणा आहे असेच म्हणायला हवे.

ख्रिस्तांनी पृथ्वीवर जन्म घेऊन महान कार्य केले; त्यासाठीच त्यांचे सुळावर चढणे हे विधिलिखित होते व तसेच घडले. पण सुळावर चढणे गौरवास्पद नसून त्यांच्या सारखे आपणही आपले पुनरुत्थान साध्य करुन घेणें हें मनुष्य जन्माचे वैभव आहे. ते शक्य नाहीं असे म्हणणें चूक आहे कारण तुमचे पुनरुत्थान झालेलेच आहे. मानवांच्या बाह्यांतील स्वभाव-विशेषांवरुन आपण जे निष्कर्ष काढतो ते सर्व चुकीचेच असतात. तुम्ही स्वतः परमचैतन्याचे अनेक चमत्कार प्रत्यक्ष बघितले आहेत. मी अशा चमत्कारांचे पुस्तकरुपांत संकलन करुन प्रसिध्द करण्याचे ठरवले होते पण लोकांनी कळवलेल्या त्यांच्या अनुभवांची संख्या एवढी प्रचंड झाली की मला तो बेत सोडून द्यावा लागला. पण जे स्वतःला बुध्दिवादी म्हणवतात त्यांना त्याबद्दल कांही सांगणे महा कठीण कारण त्यांच्या डोक्यात ते शिरणेंच अवघड आहे, मग पटणें दूरच. पण तरीही आपण प्रयत्न करत राहिलेच पाहिजे. आता सहजयोग बऱ्याच देशांमधें वाढला आहे, शाळा-चर्चमधेही सुरु होत आहे; पण तरीही तो आणखी फार मोठ्या प्रमाणावर पसरला पाहिजे. तुम्ही प्रत्येकाने त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे; शेजारी-पाजारी, बाजारांत, बगीचांमधे, जिथे जिथे संधि मिळेल तिथे सहजयोगाबद्दल लोकांशी बोलले पाहिजे. होईल तेवढ्या लोकांना आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे. त्या बाबतीत संकोच वा लाज वाटण्याचे कारण नाही. इटली, ऑस्ट्रिया, ऑस्टेलियामधें आतां सहजयोग खूप वाढला आहे याचे कारण, आपल्याला जे मिळाले आहे तो आनंद दुसऱ्यांनाही मिळवून द्यायलाच हवा हे त्यांना ठामपणे जाणवले आहे.

ख्रिस्तांच्या जीवनामधून त्यांचा त्याग आपण नीट ध्यानात घेतला पाहिजे; त्यांनी सुळावर चढणे हाच फार महान त्याग आहे. म्हणून तुम्ही फक्त आपल्याच कुटुंबातील व नातलगांसाठी सहजयोग संकुचित ठेऊं नका. मला येणाऱ्या बहुतेक पत्रांमधें आपापल्या कुटुंबातील मंडळींच्या अडचणींबद्दल वा आजारपणाबद्दलच्या मागण्या असतात; किती लोकांना जागृति दिली याबद्दल कोणीच लिहीत नाहीं; कुठे कुठे व कसे यश मिळाले याबद्दल कुणीच कळवत नाहींत. खरे तर जगभरांतील सर्वच सहजयोगी तुमचे नातलगच आहेत. म्हणून सहजयोग आणखी मोठ्या प्रमाणावर पसरवण्याचे महत्त्व नीट समजून घ्या व त्याकडेच पूर्ण लक्ष लावा. हे केले नाही तर सहजयोगांतही तुमची किंमत शून्य होईल. तुम्हाला जसा प्रकाश मिळाला आहे तसे सहजयोगी खूप खूप मोठ्या संख्येने जगभर दिसावे हीच माझी एकमेव इच्छा आहे व त्यांतच मला सर्व कांहीं मिळणार आहे. सगळीकडे आजकाल चाललेले वादंग - ताणतणाव - बेबनाव इ. ना आळा घालून जग वाचवायचे असेल तर लोकांना सहजयोग सांगून त्यांना वाचवणे हे तुमचे काम आहे. सहजयोग तुम्हाला स्वतःसाठी मिळालेला नाहीं तर इतरांनाही तो मिळण्यासाठीं सहजयोगाचा प्रसार करणें हे तुमचे कर्तव्य आहे.

मला येणारी बहुतेक पत्रे वाचल्यावर मला वीट येतो. अनेक मुली लग्न जमत नसल्याबद्दल तक्रार करतात; पण आजकाल विवाहाचा फॉर्म भरणाऱ्यांमधे मुलांपेक्षा मुलींची संख्या प्रमाणाबाहेर

जास्त असल्याने त्याला इलाज नाहीं. म्हणून तुम्ही एकतर बाहेर लग्न करा किंवा वाट पहात सहजयोगाच्या कार्याला वाहून घ्या. खरे तर सहजविवाह ही आमची महत्वाची इच्छा नव्हती आणि आता सहजविवाह हा मोठाच प्रश्न बनला आहे; कुणाचा विवाह जमत नाहीं तर ज्यांची लग्ने होतात त्या पति-पत्नींचे पटत नाहीं. मला अशा प्रश्नांमधे स्वारस्य नाही. म्हणून अशा प्रश्नांबद्दल मला पत्र लिहू नका; त्यामुळे तुम्हीच सहजयोगामधे किती अ-प्रबुध्द आहांत हे दाखवता. लोकांना जागृति देण्याचे कसे व किती प्रयत्न केलेत याबद्दल तुमची पत्रे आली तर मला आनंद वाटेल. सहजविवाह होऊनही तुमचे पटत नसेल तर तो तुमचा प्रश्न आहे. माझा त्याच्याशी कांही संबंध नाहीं. सहजयोगामधेही आता हीच एक अडचण ठरत आहे. जसे इतर धर्मामधे कालवशात प्रश्न निर्माण झाले तसा सहजयोगांतही विवाह हा एक मोठा अडथळा होत आहे. सहजयोगांत आत्मसाक्षात्कार मिळूनही बऱ्याच जणांना सहजात विवाह होणे जास्त महत्वाचे वाटते. पण सगळ्यांत महत्वाची गोष्ट तुम्ही कितीजणांना जागृति दिली हीच आहे. तेच तुमचे जीवित-साध्य आहे. कमलपुष्प उमलल्यावर ते आपला सुगंधच पसरवते तसे तुम्ही कमळे बना. खिस्तांसारखे सुळावरच तुम्ही जायला पाहिजे असे मी म्हणत नाहीं, उलट मी म्हणते की तुम्ही आनंद मिळवा, शांति, मिळवा व आयुष्यांत स्थिरता आणि संतुलन प्राप्त करुन घ्या; पण त्याचबरोबर सहजयोग पसरवण्याचे कार्य तुम्ही केलेच पाहिजे. हेच तुमचे कर्तव्य आहे; किती लोकांना तुम्ही जागृति देता हे सर्वांत महत्वाचे आहे. आजपर्यंतच्या सर्व अवतरणांचे लोकांनी चीज केले नाहीं पण आता तुम्ही धडा घ्या आणि आपण किती लोकांना सहजयोग सांगू शकतो, किती लोकांना आत्मसाक्षात्कार मिळवून देऊ शकतो इकडेच लक्ष केंद्रित करा. पुढच्या वेळी मी येईल तेव्हा मला हेच ऐकायचे आहे. त्यांतच खिस्तांच्या अवतरणाचे, त्याच्या आज्ञाचक्र उघडण्याच्या अलौकिक कार्याचे व त्यागाचे सार्थक आहे. आज्ञाचक्र पार करण्यासाठी कुंडलिनी-जागृतीशिवाय दुसरा मार्ग नाहीं. हे पक्के ध्यानात ठेवा. आत्मसाक्षात्कार झाल्याशिवाय सहजयोग खऱ्या अर्थाने कुणाला समजणार नाही. म्हणून जास्तीत जास्त लोकांना जागृति देणें फार महत्वाचे आहे. माझ्याबद्दलचा तुमचा आदर, भक्ति, पूजा इ. सर्व ठीक आहे पण त्याहूनही महत्वाची गोष्ट तुम्ही किती लोकांना आत्मसाक्षात्कार मिळवून दिला ही आहे हे विसरु नका.

महिला सहजयोगींनी या बाबतीत जास्त तत्पर झाले पाहिजे; पण त्या मागे राहतात, संकोच बाळगतात. त्यां खुप कांही करु शकतात हे मी जाणते पण त्यांनी जागृति देणासाठीं उत्साहाने पुढे आले पाहिजे. म्हणून त्यांनी अधिकाधिक लोकांना जागृति देणाचे महत्व व जरुरी समजून घेतली पाहिजे. संत-सूफि लोकांनी आत्मस्वरुपावर अनेक कविता लिहिल्या, भजने लिहिली, ग्रंथ लिहिले पण त्यांची पारायणे करण्यापलीकडे लोकांनी कांही मिळवले नाहीं. पण तुम्हाला दुसऱ्यांची कुंडलिनी जागृत करण्याची व आत्मसाक्षात्काराची अनुभुति दुसऱ्यांना प्राप्त करुन देण्याची क्षमता व शक्ति मिळाली आहे. मी सहजयोग सुरु केला तेव्हां एकटी होते, त्यांतून एक स्त्री होते. पण आतां तुम्ही इतकेजण झाला आहांत; म्हणून एक आव्हान समजून जागृति देण्याच्या कार्याला लागा. एखाद्या कुटुंबातही सर्वजण सहजयोगी नसतात हे ठीक नाही. खिस्तांचा गौरव व स्तुति भजनें म्हणून होणार नाहीं तर लोकांना आज्ञाचक्राच्या पार पोचवण्यांतूनच होणार आहे; तुमच्या मधील त्यांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे म्हणून त्यांना तुम्ही नीट जाणले पाहिजे, त्यांचा आदर बाळगून त्यांचे उतराई झाले पाहिजे. आजच्या पूजेमधून तुमचा हा निश्चय व्यक्त होऊ दे. देवी तुम्ही बोलवाल तेव्हां येत नसते; ती तिच्छा इच्छेनुसार, तिच्या वेळेनुसारच येते. पण तुम्ही खरोखरच संत असाल, लोकांना संतपदापर्यंत पोचवण्याचे कार्य तळमळीने करत असाल तर मी तुमच्यामागें सदैव आहेच.एरवी तुम्ही माझी पूजा करता, माझे चैतन्य मिळवता; पण तुम्ही जेव्हा खऱ्या अर्थाने सहजयोग करता तेव्हाच तुम्ही त्याच्या प्रसाद प्राप्त करुन घेता व देवीचे चैतन्य तुम्हाला मिळते. सहजयोग असा तुमच्या समाजामधें शेजाऱ्या-पाजाऱ्यांमधे देशामधें दूरदूर जोमाने पसरला पाहिजे. म्हणून तुम्ही हे सर्व नीट लक्षांत घेऊन सहजयोगाला संपूर्ण जीवन समर्पित करुन मोठ्या संख्येने सहजयोगी निर्माण करण्याचा आज संकल्प करा.

सर्वांना अनंत आशीर्वाद

●●●



# कळवा पुजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण,(सारांश)

कळवा, ३१ डिसेंबर २००१

**सहजयोगी म्हणवून घ्यायला आपण लायक राहिलो नाही तर श्री माताजींना त्रास होईल.**

आपल्या सर्वांच्या प्रेमाखातर मी इथे आले आहे. माझी प्रकृति तशी ठीक नाहीं पण इच्छाशक्ति जबरदस्त आहे. म्हणूनच सर्व काही व्यवस्थित चालले आहे. तुम्हा सर्वांची इच्छाशक्ति पण अशीच जबरदस्त व्हायला हवी असे मला वाटते. त्याबाबतीत आपण करत आहोत हे तुमचे तुम्हीच पाहयचे अहे. आपण काय करतो व काय करायला पाहिजे याचा तुम्ही स्वत:शीच विचार करायला हवा. आत्म्याकडून तुम्हाला पुनर्जन्म दिला आहे, भ्रान्तिमधून बाहेर काढले आहे तेव्हां त्यातून पुढची प्रगति साध्य करण्याकडे तुम्ही लक्ष द्यायला हवे; आपल्याला मिळालेल्या शक्तीचा उपयोग केला पाहिजे, जोपर्यंत दुसऱ्या लोकांना सहजयोग सांगून जागृत करण्याचे कार्य तुम्ही करत नाहीं तोपर्यंत तुम्हाला मिळालेली शक्ति तुम्ही समजूच शकणार नाही व तुमचे दोष तुम्हाला समजणार नाहीत.

मी बरेच लोक असे बघितले आहेत की ते सहजयोगांत आल्यावरही पैसा कमवायच्या मागें असतात. कांही जण त्यातून सुधारतात. पण अशा संवयींचा फायदा काय? आजकाल या मुंबई शहरामधें लोकांना सिनेमाचा षोक आहे, तसे मुंबईमधे बऱ्याच अधार्मिक गोष्टी चालतात. आजकालच्या सिनेमांत अशुध्दता मोठ्या प्रमाणात दाखवतात; खरे तर सगळ्या कुटुंबाला बरोबर घेऊन बघण्यासारखा सिनेमा लोकांना आवडेल. त्याच प्रमाणे गल्ली-गल्ली मधून अत्यंत वाईट प्रकारचे धंदे चालतात. वर्तमानपत्र व मासिकांत अश्लील गोष्टी छापून येतात. हे सर्व सुधारले पाहिजे व वातावरण निर्मल झाले पाहिजे. त्यासाठी दृष्टिमधें निर्मलपणा आला पाहिजे. स्तब्ध व निश्चल नजरेत पावित्र्य असते; ज्याची नजर सदैव भरकटत राहते तो सहजयोगी नव्हेच. दुसरी गोष्ट म्हणजे लोभ व हांव; कसल्याही गोष्टीच लोभ वाटता कामा नये. त्याचप्रमाणे रागीटपणा सुटला पाहिजे. ज्याला राग येतो तो सहजयोगी नाही. राग मनातूनही गेला पाहिजे.

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे समाधान. तुम्ही जेव्हा सहजयोगाचे कार्य करता तेव्हा तुम्हाला फार समाधान मिळते. आपण जे कांही करतो त्यातून समाधान मिळाले पाहिजे. सहजयोगाच्या कार्यातही समाधान मिळवले पाहिजे. नुसते सगळे श्रीमाताजींना माहीत आहे असे समजण्यांत अर्थ नाहीं. सहजयोगांतही ज्यांना सारखे पुढे येण्याची धडपड असते त्यांत अधिकतर बेईमान व चोर लोक असतात.जे लोक अंत:करणाने साफ असतात व प्रेमाने व्यवहार करतात ते समाधानात असतात. आतां मला वाटते की समय आला आहे; तेव्हां तुम्ही माझ्यावर एक मेहरबानी करा; तुम्ही माझ्याकडून व्हायब्रेशन्स खेचून घेत असल्यामुळें तुम्ही जर सहजयोगी म्हणून ठीक नसाल तर माझी प्रकृति बिघडते. तेव्हा तुम्ही आता, निश्चय केला पाहिजे की ज्यामुळे श्रीमाताजींना त्रास होऊन त्यांची तब्येत बिघडेल असे तुम्ही कांहीं करणार नाहीं व मला प्रसन्नता मिळेल असे वागाल.

आपल्याला जग बदलायचे आहे. इथें तुम्ही बराच वेळ बसून आहात. तुम्ही तरीही निवंतपणें शांता राहण्यांत तुमची खरी ओळख आहे. तुम्हाला असे शांत असल्याचे पाहण्यात मला फार आनंद होत असतो. म्हणून सहजयोग्यांनी स्वत:बद्दल फार काळजीपूर्वक राहिले पाहिजे. नुसते रोज ध्यान करण्याने कांही साध्य होत नाहीं. तुम्ही सहजयोगात दुसऱ्यांना मदत करण्यासाठीं, या कलियुगातून

त्यांना वाचवण्यासाठी आला आहांत. नुसतें मला भेटण्यासाठीं वा माझे जवळून दर्शन होण्यासाठीं धडपडण्याला अर्थ नाही. भारतीय सहजयोग्यांत ही प्रवृति जास्त आहे. सहजयोग्यांनी आपला आत्मसन्मान राखला पाहिजे. सामान्य लोकांसारखे वागलात तर तुम्हाला सहजयोगाचा खरा आनंद मिळणार नाहीं. माझ्यावर जितके तुम्ही प्रेम करतां तसेच प्रेम अजून सहजयोगांत न आलेल्या लोकांबद्दलही तुम्हाला वाटले पाहिजे. त्यांना आत्मसाक्षात्कार देण्याची तळमळ तुमच्यांत असली पाहिजे. मी आता परदेशांत कमी जाते पण तिथे सहजयोग वाढत आहे कारण त्या लोकांना त्याची जबाबदारी आपल्यावरच आहे हे समजले आहे. म्हणून तुम्ही सहजयोग सतत लोकांना सांगत राहिले पाहिजे. नाहीं तर तुम्हाला मिळलेला आत्मसाक्षात्कार व्यर्थ होईल. तीच गोष्ट सहज विवाहाची, सहजयोगांत विवाह जमलाच पाहिजे म्हणून अस्वस्थ होऊ नका. गणपतिपुळ्यातही मी त्याबद्दल बोलले आहे; सेमिनारमधे असे बोलायला बरं वाटत नाहीं पण या गोष्टी महत्वाच्या असल्यामुळे सांगाव्या लागतात. माझी इच्छा हीच आहे की तुम्ही तेजस्वी ताऱ्यांसारखे बनावे व आपला प्रकाश सगळीकडे पसरवा. त्यासाठीं सतत आत्मपरीक्षण करुन आपण सहजयोगासाठी काय केले, काय करतो इकडे लक्ष द्या. सहजयोगाच्या प्रसारासाठी अंग झटून कार्य करणे यासारखी समाधानकारक व आनंददायक गोष्ट नाही. नवीन वर्ष सुरु होतांना कांहीतरी नवीन संकल्पना निश्चित करण्याची प्रथा आहे. म्हणून आज तुम्ही प्रत्येकाने आपण सहजयोगासाठी काय करणार याचा निश्चय करा. नुसत्या माझी पूजा करण्याचा किंवा पूजा-कार्यक्रमासाठीं काम करण्याचा कांही फायदा नाहीं. आत्मसाक्षात्कार देण्याची शक्ति आजपर्यंत कुणी मानवाला देऊं शकले नाहीत; मोठ-मोठ्या संत पुरुषांनीही ते जमले नाहीं; पण तुम्हाला ती शक्ति मिळाली आहे. म्हणून सहजयोगाचा प्रसार करण्याचा व जास्तीतजास्त लोकांना जागृति देण्याचा ठाम निश्चय आज करा. सहजयोगाचे असे कार्य तुम्ही केलेत तर तुमचेच माझ्यावर मोठे उपकार होणार आहेत, व जगभर सहजयोग पसरवण्याचे माझे स्वप्न साकार होणार आहे; त्यांतच माझ्या आजपर्यंतच्या परिश्रमांचे सार्थक होणार आहे.

नववर्षाचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

रात्री ८ च्या सुमारास श्री अरुण आपटेंच्या मार्गदर्शनात कळवा-पूजा कार्यक्रमाची सुरुवात झाली.सुरुवातीला जितेंद्र प्रसाद आणि सहकार्यानी सनईचे वादन केले. नंतर हे निर्मल माँ हे निर्मल माँ, गणेशा गणेशा श्री महागणेशा, जय दुर्गे दुगतपरिहारिणी,महाराष्ट देशा, आवाज उठायेंगे, गुरुओकी गुरु ओ कल्यानी माँ, तेरे सहजी फुकारे आज आवो मेरी निर्मल माँ, मेरी माँ पुनमका चाँद,जगदंबेचा जोगवा मागतो,बोलो आदिशक्ती श्रीमाताजी निर्मला देवीकी जय,सिहपे सवार मैया ओढे चुनरी, सातोजनम जो पुण्य किया, त्यानंतर १०.३० च्या सुमारास आदिश्क्तीचे स्टेजवर आगमन झाले त्यावेळी मंगल सनई वादन चालले होते. सुरुवातीला श्री मातर्जीनी छोटेसे पण महत्वपुर्ण अमृतवाणीत मार्गदर्शन केले. त्यानंतर लहान मुलांच्या हातून श्री माताजींच्या चरणकमलांची पुजा झाली. त्यावेळी- हेमजा सुतम भजे, जय गणपती वंदन गणरायाला, गाईये गणपती जग वंदन, तुझ्या पुजनी, महामाया महाकाली, विश्ववंदिता हि भजने झाली. साधारण १२.०५च्या सुमारास आदिशक्तीचे पुजेच्या स्वरुपाचे दर्शन झाले. त्यानंतर इंटर नॅशनल गिफ्ट श्री मातार्जीना सादर करण्याचा कार्यक्रम झाला. रात्री २ च्या सुमारास कार्यक्रम संपला. ह्यावेळी पेंडॉलमध्ये सर्वत्र टिव्ही सेटस ची व्यवस्था केली होती. तसेच लोकांना ठाणे स्टेशनपर्यत सोडण्याची व्यवस्थापण केली होती.

●●●

# गणपतीपुळे सेमिनार

डिसेंबर २००१

वृत्तांत

या वर्षीच्या गणपतीपुळे सेमिनारचे आयोजन दिनांक २३ डिसेंबर ते २९ डिसेंबर या कालावधीत आयोजित केले होते. २२ डिसेंबर पासूनच सहजयोग्यांचे आगमन सुरु झाले.दुसऱ्या दिवशीही संध्याकाळपर्यंत योगीजन येतच राहिले. सेमिनारला एकूण उपस्थिती सुमारे ८५०० होती; त्यात सुमारे २५० भारताबाहेरील होते.

२३ डिसेंबर

- पहिलाच दिवस असल्याने व योग्यांचे आगमन सुरुच राहणार गृहीत धरुन दिवसा कांहीं कार्यक्रम ठेवले नव्हते. आलेले सहजयोगी स्थिरस्थावर होण्यांत, समुद्रस्नान, जोडे-पट्टी व अल्ला-हा-अकबर करण्यांत दंग होते.
- रात्री उशिरा साधारण १० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्टेजचे डेकोरेशनचे काम अपूर्ण असल्यामुळे कार्यक्रम उशिरा सुरु झाला. श्रीमाताजी अद्याप मुंबईत असल्याचे व उद्या गणपतीपुळेला येणार असल्याचे जाहीर करण्यांत आले. तसेच हा १७ वा गणपतीपुळे सेमिनार असल्याचे सांगितले. आजचे स्टेजवरचे डेकोरेशन म्हणजे मागे मोठ्या पडद्यावर जिवंत वाटावेत असे श्रीगणेशांचे मोठे व प्रसन्न डोळे, दोन्ही बाजुला टांगती जास्वंदीची तीन-तीन फुले, पुढच्या बाजूला छोटे छोटे २५-३० उंदीर असे सुंदर डेकोरेशन होते.
- कार्यक्रमाच्या सुरुवतीला नॅशनल लिडर यांनी सर्वांचे स्वागत केले.
- कार्यक्रमाची सुरुवात नॉयडा ग्रूपने त्यांच्या नेहमीच्या वरच्या पट्टीत केली. जय गणपतीजी महाराज, जय माताजी निर्मल माताजी हो तेरी जय हो ही भजने सादर केली. कलकत्ताच्या कु. सोनीया व अनंदीता यांनी ओम गम गणपतें न महा चरणोमे तेरे कोटी कोटी प्रणाम, जब कलीयुग विदाई लेगा, ही भजने सादर केली. त्यानंतर दिपक वर्मा यांनी निर्मल चादर ओढके सहजकी, डॉ. राजेश-यमुनानगर यांनी तेरी रहमतमे दोनो जहाँ ओ निर्मल मॉ ही कव्वाली सादर केली हैद्राबादचे श्री सुब्रमण्यम यांनी मोहली यो मन मॉ हमारी मॉ तोरे लाल बिंदीया हे भजन सादर केले.नागदा चे विनोदी कवी श्री कमलेश दवे यांनी आई वडिलांबाबतच्या मुलांच्या कर्तव्याबाबत कविता सादर केली, त्यावेळी संपूर्ण पेंडॉलमध्ये सहजयोगी हसत होते. शेवटी सिंपल यांनी बहोत करीबसे तेरे जलाम को देख, जरा गणपतीपुळे आके देखो आदिशक्ती मॉ निर्मला मिलेगी, ओढू चुनरीया लाल मै नाचु तोरे अंगनमे ही ठेक्यातील भजने गाउन सर्वांना नाचवले.शेवटी तीन महामंत्र व पाच मिनिटे सामूहिक ध्यान झाल्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास कार्यक्रम संपला.

२४ डिसेंबर

- आजची सुरुवात सामूहिक ध्यानाने सकाळी ६.३० च्या सुमारास झाली. दुपारी ११.वा. नॅशनल लिडर यांनी मार्गदर्शन करताना सहजयोग्यांनी पाळावयाचे प्रोटोकॉल्स, सहजयोगाचा प्रचार व प्रसार बाबत माहिती दिली.
- दुपारी १२.३० वा. धरमशाळा शिक्षक-पालक यांची मीटिंग झाली.

- संध्याकाळी ४.३० वा. युवाशक्तिचे सेमिनार झाले
- मुख्य पेंडॉलमध्ये रात्री १०.३० वा.संगीत कार्यक्रमाची सुरुवात श्री अरुण आपटे यांच्या मार्गदर्शनाने झाली.



निर्मल-संगीत सरीताच्या ग्रूपमधील श्री निंबाळकर यांनी भजने सादर केली,

- श्री गुरुजींनी व्हायलीनवादन केले, श्री शाम जैन यांनी भजने सादर केली, श्री शिवलीकर यांनी सतार वादन सादर केले, श्रीमती छायाने भजने सादर केली, शेवटी रात्री १ च्या सुमारास शंकर भट्टाचार्य यांनी सरोदवादन केले. त्यांनी राग अभोगी वाजवीला शेवटी त्यांनी सादर केलेल्या भैरवीने कार्यक्रमाची सांगता रात्री २.००च्या सुमारास झाली.
- आजच्या स्टेजच्या डेकोरेशनमधे मागे ब्रम्हदेवाचे डोळे, बाजूला अंतराळातील अनेक ग्रह, पुढच्या बाजुला अनेक छोटे छोटे हंस असा देखावा होता.
- रात्री १२च्या सुमाराच प.पू. श्री माताजींचे गणपतीपुळे पर्यटन विश्राममधें फटाक्यांच्या प्रचंड आताषवाजीत आगमन झाले. त्यावेळी रस्त्यावर दोन्ही बाजूला कार्यकर्ते हातात तेवत्या मेणबत्या घेऊन उभे होते. आदिशक्तीच्या आगमनानंतर प्रचंड मोठा ख्रिसमस केक आदिशक्तिने कापला. त्यावेळी पाश्चात्य योग्यांचे Coral Singing चालले होते. केकचा प्रसाद सर्वाना वाटण्यात आला.

२५ डिसेंबर

- आजच्या पूजेच्या दिवसाची सुरुवात सकाळच्या ६ वा. च्या सामूहिक ध्यानाने झाली.
- दुपारच्या सत्रात सहजयोग्यांनी काही अनुभवलेल्या चमत्कारांबाबत माहिती सांगीतली.
- रात्री ७.००पर्यंत पूजेसाठी मुख्य पेंडॉलमध्ये सर्वजण उत्साहाने खास पोषाखांत जमले.
- पुजेच्या कार्यक्रमाची सुरुवात प्रसन्न वातावरणात रात्री ८ च्या सुमारास श्री अरुंण आपटे यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यावेळी - अपने दिलमे सहजको बसाया करो, आवाज उठायेंगे, नमो नमो मारीया, निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तूती, श्री जगदंबे आई रे, माँ आजावो माँ आजावो हमे दर्शन देदो, अबिर गुलाल, जय जय जय दुर्गे माता भवानी, जय जय हो महिमा तेरी, जय दुर्गे दुर्गती परिहारीणी, चरणोमे माँ तेरे चरणोमे, निघाली दिंडी निघाली माझ्या निर्मला आईची, अनादी निर्गुणी प्रगटली भवानी,जगदंबेचा जोगवा मागते आई अंबेचा जोगवा मागते, विजयी निर्मल शारदे सात जन्म जो पुण्य किया, ही भजने श्रीमाताजींच्या आगमनापूर्वी झाली.
- रात्री ११ च्या सुमारास अत्यंत चैतन्यमय वातावरणात आदिशक्ति प.पु.श्रीमाताजींचे पेंडॉलमध्ये आगमन झाले. त्यानंतर साधारण पाऊण तासाच्या त्यांच्या मधुर अमृतवाणीनंतर पूजा सुरु झाली.पूजेचे भाषण वेगळे दिले आहेच. सुरुवातीला गणपत्यथर्वशिर्ष घेतले आणि पुढील भजने म्हटली- जगी तारक जन्मा आला, हे प्रेम मूर्ती जगी आले,तुझ्या पुजनी, महामाया महाकाली, शेवटी विश्ववंदिता साधारण रात्री १.३० च्या सुमारास आरती झाली.
- पूजेनंतर जगभरातून आलेल्या सहजयोग्यांनी नॅशनल गिफ्ट श्रीमाताजींना अर्पण केली. तासभराने कार्यक्रम संपला.त्यानंतर






सर्वांनी सामूहिक ध्यान केले.आजचे डेकोरेशनमधे मागे प्रत्यक्ष श्रीमाताजींचे डोळे भासत होते, बाजूला दोन्हीकडे दोन पऱ्या, पुढच्या बाजुला कुंडलिनीच्या अनेक ज्योती असा देखावा होता.

२६ डिसेंबर

- आज कार्यक्रमाची सुरुवात दुपारच्या सत्राने झाली.श्री अरुण आपटे यांनी सर्वांना संगीताच्या माध्यमातून ध्यान कसे करावयाचे याचे मार्गदशन केले. तसेच सर्व चक्रांचे राग व त्यांचे मंत्र सुरामधें म्हणण्याची पध्दत समजावून सांगितली व त्याप्रमाणे सर्वांकडून ध्यान करुन घेतले. त्याचबरोबर भारतीय संगीत-शास्त्र. संगीताचा इतिहास, नाद-स्वर-राग संकलपना व सहजयोगांतील त्यांचे मूलभूत संबंध इ.स्पष्ट करुन सांगितले. सदर कार्यक्रम अत्यंत सुंदर झाला. त्यांना सौ सुरेखा आपटे यांची बहारदार साथ होती.
- रात्री ७ च्या सुमारास संगीत कार्यक्रमाची सुरुवात झाली.रात्री आदिशक्तीचे धरमशाळेच्या मुलांच्या लेझिमच्या ठेक्यात आगमन झाले.पेंडॉलच्या पुढच्या मोकळ्या जागेत मुलांनी अत्यंत सुंदर लेझिमची प्रात्यक्षिके श्री माताजींच्या गाडीसमोर सादर केली.सदर धरमशाळेच्या मुलांकडून लेझिम पुण्याचे श्री महेश मोकाशी यांनी अत्यंत मेहनतीने बसवून घेतली होती.
- स्टेजवर प्रथम श्रीमाताजींसमोर धरमशाळेच्या मुलांनी, प्रिय अमुचा असा हा सहजयोग हा हे गीत सादर केले. त्यानंतर नाशिकच्या धुमाळ आणि ग्रृपने राग पंचममालकंस सादर केला,नंतर धरमशाळेच्या मुलांनी चलत मुसाफिर हे गीत सादर केले, त्यावेळी गाण्यात उल्लेख केल्यानुसार सर्व देवतांची रुपे स्टेजवर मुलांनी सादर केली. हा कार्यक्रम पुण्याच्या कु. वर्षा कळंवटेनें बसविला होता.विणासत्यनाथन यांनी कथक सादर केले,त्यांना संगीत सरीतेने साथ दिली. त्यांनी-नमामी श्रीगणरज, तोडी, कृष्ण नृत्य, ब्रम्ह शोधिले ह्या गाण्यावर आदाकारी सादर केली. छत्तिसगड च्या भारती बंधुनी अनेक कबिराची सुंदर भजने सादर केली. त्यांच्या कार्यक्रमावर संपुर्ण पेंडॉल खुश होता. त्यांना श्री माताजींनी अनेक अशीर्वाद दिले रात्री २.००च्या सुमारास कार्यक्रम संपला.
- स्टेजच्या पडद्यावर आज लक्ष्मीरुपाचे डोळे, बाजूला दोन्हीकडे तीन-तीन श्रीचक्रे, पुढच्या बाजूला अनेक कमळे असा सुंदर देखावा होता.

२७ डिसेंबर

- आजच्या दिवसाची सुरुवात सकाळच्या ७.००च्या सामुहिक ध्यानाने झाली.
- दुपारच्या सत्रात प्रामुख्याने परदेशात सहजयोगाच्या झालेल्या प्रसाराबाबत माहिती सांगितली.तसेच रशियात सहजयोगाच्या संशोधनावर एक पुस्तक तयार होत असल्याचे सांगितले.त्यानंतर सर्व सहजयोग्यांनी एकमेकांना व्हायब्रेशन्स देणे,चेकिंग याबाबत प्रत्यक्ष सर्व सहजयोग्यांकडून प्रात्यक्षिक करुन घेण्यात आले. स्वागतम सु स्वागतम हे नविन गाणे म्हणुन घेतले.शेवटी तीन महामंत्राने कार्यक्रम दुपारी २ च्या सुमारास संपला.
- संध्याकाळी ७ च्या सुमारास कार्यक्रमाची सुरुवात वेगवेगळ्या सेंटरच्या भजनांनी झाली.



• प्रथम श्री नलगीरकरांनी मार्च मध्ये पुणे येथे शिवपूजा होणार असल्याचे व दिल्लीला बर्थ डे पूजा व पब्लीक प्रोग्राम होणार असल्याचे जाहीर केले. नंतर नव वधु-वरांची नावे जाहीर केली.



• दोन महिने अविश्रांत मेहनत घेऊन गणपतिपुळे सेमिनारची तयारी केलेल्या १६९ स्वयंसेवकांच्या प्रतिनीधींनी यु तो क्या क्या नजर नही आता ही कव्वाली सादर केली.मुंबईच्या छोट्या राधिका मानने गाऊन व पेटीवर वाजवून राग बिहाग सादर केला.त्यानंतर कोल्हापुरच्या कौशल्या करांडे यांनी भरतनाट्यम - स्वये श्री रामप्रभु ऐकती कुश-लव रामायण गाती- या गीतावर सादर केले. ऑस्ट्रेलीयाच्या कॅथरिनोने व्हायोलीनवर राग मालकंस वाजविला. उत्तरप्रदेश मधील शामली चे एक अनपढ ,अडाणी श्री शंभु यांनी मटक्याच्या ठेक्यात स्वत: रचलेली अनेक सुंदर सुंदर भजने सादर केली.-सहजयोग मे तु आईये जो जीना चावे,ध्यान बिन कुछ पावत नही चाहे तिरथ करले हजार,तिरन हे तो वही सहज योगमे आवेगा,तु सहजयोगमे आ तेरी उमर ध्यान करणेकी अशी बहारदार भजने सादर केली, त्याला अत्यंत सुंदरा व्हायब्रेशन होती.

• त्यानंतर पुणे सहजयोग केंद्र द्वारा श्री बागडदे आणि ग्रुपने श्री अरुण आपटेंच्या मार्गदर्शनात बसविलेली अत्यंत ठेक्यातील ये मेरी माताका करम है -ही कव्वाली सादर केली. या कव्वालीवर श्रीमाताजी विशेष प्रसन्न झाल्या.

• धरमशाळेच्या मुलांनी एक कव्वाली सादर केली.प्रसाद खापर्डेनी राग जोग सादर केला त्याला गुरुजींनी व्हायलीनवर साथ दिली.शेवटी धरमशाळेच्या सिनीयर ग्रुपने दशावतार हा नृत्य प्रकार, त्यामधून विष्णुची दहा वेगवेगळी रुपे सादर केली. सदर कार्यक्रम पुण्याच्या कु वर्षा कळंवटे हिने अत्यंत मेहनतीने बसविला होता.

• आज स्टेजवर मागील बाजूला पडद्यावर शिवाचे रुपातील डोळे, बाजूला दोन मशाली ज्या सतत तेवत ठेवलेल्या भासत होत्या, पुढच्या बाजूला दोन नाग असा आकर्षक देखावा सादर केला होता.

२८ डिसेंबर

• सकाळी ७ च्या सामूहिक ध्यानाने आजच्या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

• त्यानंतर ११ च्या सुमारास परदेशी सहजयोग्यांना गिफ्ट वाटप,नंतर भारतीय सहजयोग्यांना गिफ्ट वाटप झाले.दुपारी उशीरा पर्यंत सदर कार्यक्रम सुरु होता.

• रात्री ९च्या सुमारास कानपुर सेंटरच्या ग्रुपने अमर गणेश ही नृत्य नाटिका सादर केली. नेरुल सेंटरच्या ६-७ वर्षाच्या मुलाने आई अंबे भवानी उदे उदे या जोगव्यावर नृत्य सादर केले. राजस्थानच्या युवाशक्तीने गण-गौरी डान्स केला. धरमशाळा सिनीयर ग्रुपने गणपती पुळे बनाना है हे भजन सादर केले. त्यानंतर शांती-सुकन्या यांनी कुची पुडी डान्स केला.रात्री १० च्या सुमारास आदिशक्तिचे आगमन झाले.त्यानंतर प्रसिध्द बासरी वादक श्री रार्जेद्र प्रसन्ना यांनी मधुर बासरी वादन केले.रात्री ११ च्या सुमारास हैद्राबादच्या कव्वालांचे स्टेजवर आगमन झाले.त्यांनी माताजी माताजी माताजी, है यही सच बात मै कहता हु या क्वाली सादर केल्या आणि लोकांना तासभर नाचवले. रात्री १ च्या सुमारास कार्यक्रम संपला.

• आजचे स्टेजचे डेकोरेशन पडद्यावर श्रीकृष्णाचे डोळे, बाजूला तीन-तीन मोरपीसे पुढच्या बाजूला झावळ्यापासून केलेली पिसे असा देखावा केलेला होता. विषेश म्हणजे आज आदिशक्तिची साडीसुध्दा निळ्या श्रीकृष्णाच्या आवडत्या रंगाची होती.

२९ डिसेंबर

• आजच्या शेवटच्या लग्नाच्या दिवसाची सुरुवात सकाळच्या ६.३०च्या सामुहीक ध्यानाने झाली.

• नंतर नॅशनल लिडर यांनी सर्व लिडरांची मीटिंग घेतली. त्यामध्ये भारतातील व जगातील सहजयोग्यांच्या संख्येबाबत आढावा घेतला. तसेच वेब साईटच्या माध्यमातून सहजयोगाच्या प्रसार माध्यमाचे महत्व सांगीतले.

• दुपारी लग्नाची तयारी सुरु झाली. संध्याकाळी ७ च्या सुमारास



पेंडॉलमध्ये सर्वजण जमू लागले. नवरदेव वेशीच्याबाहेर घातलेल्या मांडवात बसले होते. त्यांना श्रीमाताजींनी मार्गदर्शन केले, नंतर सजविलेल्या बैलगाड्यामध्ये वाजत गाजत नवरदेव पेंडॉलमध्ये आले. इकडे स्टेजवर नववधू गौरी पूजनासाठी बसल्या होत्या. त्यांनी श्रीमाताजींच्या चरणाची पूजा प्रसिध्य वासरी वादक श्री राजेंद्र प्रसन्ना यांच्या सनईच्या मधुर साथीनें केली. साधारण ९ च्या सुमारास ६४ लग्ने लागली. मंगलाआष्टके आपटे फ्रॅमिली व स्विझर्लंडच्या सरीता कोलबेल(बकरे) यांनी म्हटल्या.त्यानंतर कन्यादान,सप्तपदी,इत्यादी सर्व विधी झाले.त्यानंतर सर्व जोडप्यांना पुढच्या बाजुला बसविण्यात आले. प्रत्येकाला नाव घेण्यास सांगण्यात आले, एकमेकांना घास भरविण्यात आला.

- त्यानंतर पुणे सहजयोग केंद्र द्वारा श्री बागडदे व सहकाऱ्यांनी श्रीमाताजींच्या समोर -माताका करम, या हयु या करम या कव्वाली सादर केल्या. त्यावेळी सर्वजण नाचत होते. रात्री १.३०च्या सुमारास कार्यक्रम संपला.
- शेवटी ऑस्ट्रेलीयाचे श्री अविनाश निचकवडे यांनी सर्व संयोजकांचे आभार मानले.
- आजचे डेकोरेशनमधे मागच्या बाजूला शिव-पार्वतीचे डोळे दाखविले होते. मुख्य कमान कायम स्वरुपी सिमेंटमध्ये तयार केली होती.त्यावर फायबरमध्ये तयार केलेले सूर्य व चंद्र दाखविले होते. बाजूला अत्यंत आकर्षक वेगवेगळ्या रंगात दिसणारे कारंजे उभारले होते. पुढच्या मुख्य चौकात एक कारंजे व बाजूला पृथ्वीला घोड्याच्या रथात बसलेल्या आदिशक्ति असा देखावा उभारला होता. स्टेजच्या बाजूच्या एका कोपऱ्यात कै बाबामामा,श्री शिवाजी महाराज,रविंद्रनाथ ठाकुर,लग्नाचा देखावा इ देखावे सादर केले होते. रोज पूजेसाठी मुंबईवरुन ताजी फुले मागविण्यात येत असत.
- अशा तऱ्हेने २००१ चा गणपतीपुळे सेमिनार सर्व उपस्थितांना चैतन्य, आनंद व सामूहिकतेचा अपूर्व ठेवा देऊन यश्स्वीपणें पार पडला.
- उल्लेख करण्यासारख्या इतर गोष्टी म्हणजे सहजयोग्यांसाठी पिण्याच्या बिसलरी पाण्याची व्यवस्था केली होती. एकुण साधारण ८ ट्रक प्रत्येक ट्रकमध्ये ३५० गॅलन प्रत्येकात २० लिटर पाणी अशी व्यवस्था केली होती.तसेच जेवणाची व्यवस्था दिल्लीचे सॅन्टिनीयस केटरर्सचे श्री निक्कु शर्मा यांनी पाहिली. त्यांनी दि. १८ पासुनच मिठाई तयार करण्यास सुरुवात केली होती.दिल्लीवरुन २५० लोकांची कुकिंग टिम आणली होती. तसेच ४० व्हॉलेंटीअर्स होते. येताना ६-७ ट्रक सामान दिल्लीवरुन आणले होते. तसेच रोजच्या भाजीसाठी कोल्हापुरवरुन भाजीचा ट्रक मागविण्यात येत असे. एकुण ९ रेडिओ सेट ठेवले होते. स्वत:चा जनरेटर सेट टेवलेला होता. तसेच पहिल्यांदाच जेवणाच्या पेंडॉलमध्ये श्री माताजींची भजने सतत लावण्यात आली होती.संपुर्ण पेंडॉल साधारण ४० ००० स्वे.फुटाचा होता.जेवणाची व्यवस्था अत्यंत चांगली होती. सेमिनारचे नियोजन व व्यवस्थापन मेहनतपूर्वक केल्याचे यावरुन लक्षात येईल.




●●●

# अमृत वाणी

## श्री गणेश तत्त्व

-निराकारात जे ब्रह्म आहे तेच साकारात श्रीगणेश आहेत.

-आत्म्याच्या प्रेरणेने, आत्म्याच्या ज्ञानाने मनुष्यामध्ये एक अद्वितीय असा नवा आयाम बनवते त्याला विवेक म्हटले जाते. हा विवेक श्रीगणेश आम्हांला देतात.

-आता आपण जर गणेशस्वरुपात आहात तर आपल्यामध्ये शांत चित्त फार जरुरीचे आहे. आपल्यात क्रोध आहे तर आपण गणेशांच्या विरोधात जात आहात.

-जरी तुमचा आत्मसाक्षात्कार प्राप्त केला, जरी तुमचे आत्मतत्व घटीत होऊ लागले, जरी तुम्ही दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देत आहात, तरी तुमच्याजवळ पवित्रता(शील) नसेल तर तुम्ही कुणीच नव्हे. ते केवळ तुटलेल्या काचेसारखे आहे, जी काहीतरी परावर्तित करण्याचा प्रयत्न करत आहे. ती कधीच योग्य प्रतिमा सांगण्याचा प्रयत्न करत आहे.

-तुमच्या पवित्रतेचा मान राखणे म्हणजे खरोखर माझा मान राखणे आहे. कारण मी तुमच्यातच पवित्रतेच्या रुपाने राहते. जर गणेश मांगल्य आहे तर पवित्रता म्हणून मी तुमच्यतच रहाते.

-एकतर तुम्हांला जरी तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहांत हे माहित नाही किंवा तुम्ही मला जाणत नाही. श्री गणेश त्यांच्या आईचे इतके आज्ञाधारक का होते? कारण तीच सर्वात सूक्ष्म गोष्ट होती.

-प्रत्येक गोष्ट जी चैतन्य उत्सर्जित करते ती मंगल आहे, ती शुध्द आहे. आणि जी करत नाही ती कोणत्याही प्रकारे मंगल नाही. त्यामुळे तुम्ही ज्यांची पूजा करता किंवा ज्याचा स्वीकार करता ते मंगल असले पाहिजे.

-तुमचा आत्मसाक्षात्कार मिळविल्यावर, जेव्हा तुमच्या चित्तामध्ये श्रीगणेश चकाकित असतात, तेव्हा तुमचे प्रतिबिंब स्वच्छपने पाहून त्याला सुधारण्याचा प्रयत्न करा. जरी नुसत इतकं म्हटलं की, माझ्या हितासाठी मला कार्यान्वित व्हायच आहे तरी तुम्ही कराल



-अबोधितता ही आत्म्याची शक्ती असल्यामुळे आध्यात्मिक जाणीव प्रगल्भ होण्यासाठी तुम्हाला ती मदत करते. म्हणून ही अबोधितता बाहेरुन मिळवता येत नाही तर तुम्ही आतमध्ये ती वापरली पाहिजे. हे सहजयोगामधून आत्मसाक्षात्कार मिळविल्यावरच घटित होते. मग जीवनातील सर्व प्रकारच्या विरोधी व नकारात्मक गोष्टीं पासून श्री गणेशांची माता तुम्हाला संरक्षण आधार देते आणि तुमचा सांभाळ करते.

-महाकालीच्या शक्तीने फक्त सगळ्यात पहिल्यांदा श्रीगणेशांना जन्म दिला. तेव्हां श्रीगणेशांची स्थापना झाली. श्री गणेश हे सर्वात पहिल्यांदा स्थापन केलेले दैवत आहे आणि त्याचप्रमाणॆ जसे महाकालीचे आहे तसेच श्रीगणेशांचे आहे हे बीज आहे आणि बीजातूनच सर्व विश्व निघाल्यावर परत बीजातच सामावले जाते. श्री गणेश हा सर्व जे काही आहे त्याचा बीज आहे.

-श्री गणेशतत्त्वाचा मनुष्य हा अत्यंत सात्त्विक असतो. त्या माणसामध्ये एक विषेश तऱ्हेचे आकर्षण असते. त्या अकर्षणात एवढे पावित्र असते की, ते आकर्षणच माणसाला सुखी ठेवते.

-पदार्थ विज्ञानात आपण ज्याला विद्युत चुंबक शक्ति म्हणतो त्याच्या मुळाशी श्री गणेशांची ही शक्तिच अंतर्भुत आहे. ही शक्ती कार्य करु लागली म्हणजेच वेगवेगळ्या तर्हेने वेगवेगळ्या स्तरावर उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये तिचा अविष्कार होतो.

-श्रीगणेश आदिशक्तिच आहे हे जाणतात आणि तिच्यापुढे शरण असतात. ते आणखी कोणाला ओळखत नाहीत. सहजयोगात ही महत्त्वाची गोष्ट आहे. ऐकवेळ श्रीगणेशांच्या विरोधात वागलात तर ते क्षमा करतील, पण आदिशक्तीच्या विरुध्द वागलात तर ते शिक्षाच करतील. आदिशक्ती स्वत: शिक्षा करत नाहीत देवताच शिक्षा करतात.

-जी सूक्ष्मता तुम्हांला सहजमधून मिळाली आहे ती श्रीगणेशांची कृपा आहे. श्रीगणेशांनीच परमचैतन्य दिले आणि तेच चैतन्यस्वरुपात आपल्या सर्व चक्रांवर आहेत.

-श्रीगणेशांचा सर्वात मोठा गुण म्हणजे अबोधिता तुम्ही जेव्हा अबोधित होता तेव्हा तुम्ही सहज व शुध्द बनता. ख्रिस्त म्हणाले होते, तमच्या उद्दाराची वेळ येईल तेव्हां तुम्ही लहान मुलासारखे व्हाल. श्रीगणेशांची कृपा असतेच पण विशेष म्हणजे य अबोधिततेच्या शक्तीमधूनच तुम्हांला आत्मसाक्षात्कार होत असतो.



दहा गुरुंचे अवतरणे

# कन्फूशियस

लाओत्सेचा समकालीन असलेल्या कन्फूशियसचा जन्म चीन मधील 'शाटुंग' राज्यात इ.स. पूर्व पांचव्या शतकांत झाला. त्यांचे वडील त्यावेळी सत्तर वर्षांचे होते. त्यांचे मूळ नांव 'कुंगात्से' असे सांगण्यात येते आणि त्याचा अर्थ तत्वज्ञ / गुरु असा होतो व लॅटिन भाषेतील त्यांचे कन्फूशियस हे नांव आहे. ते तीन वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले व त्यांच्या आईने त्यांचे संगोपन व शिक्षण केले.

वयाच्या विसाव्या वर्षी 'लू' राज्यांत दरबारी महसूल खात्यात त्यांनी नोकरी सुरु केली. आजूबाजूच्या अव्यवस्थित कारभाराचा अभ्यास व विचार करुन दरबारी कामांत सुधारणा व व्यवस्थितपणा आणण्यांत त्यांना यश मिळाले व तेथील राजाचे ते विश्वासू मित्र बनले. यांतच त्यांच्या व्यवहारी शिकवणुकीचे बीज होते. चोवीस वर्षांचे असतांना त्यांच्या आईचे निधन झाले आणि त्यावेळच्या शोकप्रदर्शनाच्या प्रथेप्रमाणें तीन वर्षांसाठी त्यांनी दरबारी सेवेच राजीनामा दिला. याच काळांत संत-गुरु म्हणून ते प्रसिध्दीस आले. त्यावेळी त्यांच्याभोवती साक्षर-निरक्षर, मजूर, शेतकरी असे सर्व तऱ्हेचे लोक जमत व त्यांचे उपदेश ऐकून प्रभावित होत असत.

त्यानंतर पुन्हा नोकरी सुरु केल्यावर दहा वर्षांमधे जबाबदारीने केलेल्या कार्यांमधून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांवर व वरिष्ठांवर, तसेच अन्य अधिकाऱ्यांवर प्रभाव पाडला. गरीब व शिक्षणाअभावी गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळलेल्या व बेरोजगारीने त्रस्त झालेल्या लोकांसाठी त्यांनी अनेक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. पण राज्यकर्त्यांच्या आपापसातील दुफळी व बेबनाव, लढायांमुळे त्यांना नोकरी सोडावी लागली व सुमारे दहा-बारा वर्षे अत्यंत खडतर परिस्थितीत भटकंती करण्यात गेली. जे थोडेफार शिष्य बरोबर होते त्यांना उपदेश करणें मात्र त्यांनी चालूच ठेवले. सरतेशेवटी वयाच्या एकुणसत्तराव्या वर्षी ते आपल्या 'लू' राज्यांत परतले. त्यानंतर वयाच्या साधारण त्रेहत्तराव्या वर्षी हलाखीच्या परिस्थितीत मृत्यू येईपर्यंतचा काळ त्यांनी लोकांना उपदेश करण्यात व आपली शिकवण ग्रंथबध्द करण्यांत व्यतीत केला. त्यांच्या मृत्यूनंतर सुमारे एक शतकानंतर 'चेनिकस' नांवाच्या शिष्याने त्यांच्या उपदेशांना मान्यता मिळवून दिली.

कन्फूशियसचे प्रसिध्द ग्रंथ: -

1) The Shu King : Science of Histry
2) The Shee King : Science of Poetry.
3) The Iye King : Science of Revolution
4) The Lee King : Science of Justice
5) The chun Chiu King : Autum.

(इथे King हा शब्द मूल्यवान अशा अर्थाचा आहे)

कन्फूशियस एखाद्या सामान्य माणसासारखे जीवन जगले. माणसांबद्दल त्यांना उपजत प्रेम होते व आपल्याभोवती माणसांचा गराडा पडलेला त्यांना आवडत असे. सर्व मानवांवर प्रेम करणें हा त्यांचा स्थायीभाव होता; मानवजात हेच एक कुटुंब आहे असे ते नेहमी सांगत. लाओ-त्सेचे समनालीन असले तरी त्यांच्याप्रमाणे अध्यात्मिकतेवर भर न देता कम्फूशियस व्यावहारिक जीवनधर्मावर जास्त उपदेश करत व मानव म्हणून गुण्यागोविंदाने राहण्याचा उपदेश देत असत.

कन्फूशियस यांच्या उपदेशांतील कांही विशिष्ट अवतरणे : -

१) ज्ञान म्हणजे स्वतःला काय माहित आहे व काय माहित नाही हे दोन्ही जाणणे.

२) क्रूर राज्यकर्त्यांपेक्षां लोकांना हिंस्त्र पशूदेखील कमी धोकादायक वाटतो.

३) प्रेमाची सिध्दता प्रेमानेच आहे; प्रेम म्हणजेच शांति, प्रेम म्हणजेच आनंद, प्रेमाला युध्दसुध्दा आव्हान देऊ शकत नाही.



# दिवाळी पूजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

लॉस एन्जेलिस, अमेरिका, १८ नोव्हेंबर २००१

आजचा दिवस फार महान व ऐतिहासिक आहे कारण आता सैतानी प्रवृत्तींचा नायनाट झाला अहे. या सैतानी प्रवृत्ति दोन कारणांमुळे प्रबळ होतात; एक म्हणजे हे लोक अज्ञानाच्या अंध:कारांत वावरत असल्यामुळे चुकीच्या मागाकडे वळतात व स्वत:ला शक्तिशाली समजतात. या भ्रान्तिमुळेच त्यांचा सर्वनाश होत असतो. त्यामुळेच आपल्यावर एक भयंकर संकट आले होते. पण आतां ते सहज टळले आहे. हा जटिल प्रश्न चुकीच्या संकल्पनांमधून निर्माण केला गेला व तो इतल्या सहजासहजी व लवकर सुटेल असे कुणालाच वाटत नव्हते. मला दिवाळीपूर्वीच तो सुटावा असे वाटत तोते आणि तेच घडून आले आहे.

अज्ञानामुळे लोक अनेक भलत्यासलत्या गोष्टी करतात; कुणी एखाद्या विशिष्ट धर्माला वा विचारप्रणालीला चिकटून बसतात. याला कारण म्हणजे त्यांना सत्य समजलेले नसते आणि ते कसे मिळवायचे हे माहित नसल्यामुळे आपल्याला सर्व कांही समजले आहे अशा भ्रमांत ते रहातात. यामुळेच लोकांमधे दुही निर्माण होते आणि असे मूर्ख लोक स्वत:चाच सर्वनाश ओढवून घेतात. आतां सहजयोग मिळाल्यामुळे तुम्हांला सत्य समजले आहे व त्याचे सर्व सूक्ष्म ज्ञानही प्राप्त झाले आहे. त्या इतर लोकांना हे ज्ञान नसल्यामुळे अज्ञानातून ते चुकीच्या मार्गाकडे वळतात व सत्कार्य करणाऱ्या चांगल्या लोकांना विरोध करतात. पण परमात्मा हे सर्व पहात असतो व अशा नाट्यपूर्ण घटनांमधूनच त्याची परम शक्ति दिसून येते. हे सर्व सुरळीतपणे घडवून आणले गेले आहे आणि तुम्ही सहजयोगीच ते जाणू शकता.एरवी जीवनात यशस्वी ठरलेल्या लोकांच्या कदाचित हे लक्षात येणार नाही. पण तुम्ही साक्षी असल्यामुळे हे समजू शकता. या सर्व प्रकरणांत जगांतील अनेक देश सहभागी झाले असले तरी तुम्ही सहजयोगी त्यापासून अलिप्त असल्यामुळेच तुमच्या हे सर्व नीट लक्षात येते. दिवाळीच्या आधीच या गुंडगिरीचा शेवट होईल यावर कुणाचाच विश्वास बसण्यासारखी परिस्थिति नव्हती. मूर्खपणाच्या कारवाया करणाऱ्या लोकांमुळें सुरवातीला कांही प्रमाणांत प्रभाव पडत असला तरी शेवटी त्यांची काय प्रतिमा बनते हे लक्षांत घ्या. तुम्ही साक्षात्कारी असाल वा नसाल, जे कांही घडले ते एक चमत्कार वाटावा हेच तुमच्या लक्षांत येईल.

**सहजयोग पसरवण्याचा सातत्याने प्रयत्न करण्याचे आव्हान आपल्याला स्वीकारलेच पाहिजे.**

आता आपल्यासाठी एक नवीन काळ सुरु झाला आहे आणि अधिकाधिक लोकांना साक्षात्कार देण्याचे आव्हान तुमच्यासमोर आहे. लोक आतां पूर्वीसारखे अनपढ किंवा भरकटअलेल्या बुध्दीचे राहिले नाहीत; जे कांही आपण सत्य मानत आलो आहोत त्याच्या पलीकडे सत्य आहे असे त्यांना वाटू लागले आहे. माणसाचा स्वभावविशेष असा आहे की एखादी सत्याबद्दलची संकल्पना त्याच्या डोक्यात शिरली की तो त्यालाच घट्ट चिकटून बसतो व त्याची सत्यता पडताळून पाहण्याचा प्रयत्न

करत नाहीं. जनावरांचे तसे नसते; आपल्या जीवाला धोकादायक गोष्ट जाणण्याची उपजत बुध्दि त्यांना असते.कुत्रासुध्दां चोरासारखा इसम दिसला की लगेच भुंकेल किंवा त्याच्यावर धाऊन जाईल. पण माणसाला जास्त प्रगल्भ बुध्दि व विचार करण्याची क्षमता मिळाली आहे, तो आपले अन्नपदार्थ स्वत: बनवूं शकतो. पण म्हणूनच मला कधीकधी शंका वाटते की तो बुध्दीसुध्दा नको तशी वापरत असतो.म्हणूनच लोकांचे विचित्र वागणें व अहंकारामुळे सत्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणें आश्चर्यकारक वाटते. सध्याच्या घटनांकडे एक नाटक म्हणून पहा असे मी वर म्हटले खरे पण म्हणून तुम्हीही स्वत:कडेही त्याच दृष्टिकोनामधून पहा व आपणही त्यांत कसल्याही प्रकारे सहभागी तर होत नाही ना हे तपासून पहा; त्यासाठी तुम्हाला तुमचा अहंकार, प्रतिअहंकार, संस्कार, यांच्या पलीकडे उठले पाहिजे; त्या स्थितीमधून -आपण काय करत आहोत, आपले चित्त कुठे -कुठे भरकटत आहे, माझ्या आग्रही मतांचे कांही खास कारण आहे कां, मी चुकीच्या गोष्टींचे का समर्थन करतो-असे प्रश्न स्वत:लाच विचारुन पहा; त्यानंतर जर तुमच्यामधेही तशा गैरसमजुती अंशमात्र प्रमाणात जरी आढळून आल्या तर तुम्ही वर उल्लेख केलेल्या बुध्दिभ्रष्ट व अनिष्ट प्रभावाखाली आलेल्या लोकांना क्षमा करा. कारण तुम्ही त्यांच्यापेक्षा वरच्या स्थितीला पोचलेले मानव आहांत. ही गोष्ट तुम्ही नीट ध्यानात घेतली पाहिजे. अर्थात त्यांच्यापैकी जे लोक अगदीच खराब आहेत त्यांचा विचारही करुं नका कारण ते काम परमात्मा करणार आहे.

म्हणून स्वत:बद्दल परखडपणें आत्मपरिक्षण करणें फार महत्वाचे आहे. आरसा स्वच्छ असला तरच आपले प्रतिबिंब त्यांत नीटपणे दिसून येते तसे हे आहे. स्वत:ला स्वच्छ करण्याबद्दल काटेकोरपणें तुम्ही प्रयत्न करत रहाणे आवश्यक आहे. जे कुणी तुमच्यापैकी चुकीच्या गोष्टींच्या मागे लागतील त्यांचे परिणाम त्यांनाच भोगावे लागणार आहेत. हे आत्मपरिक्षण जागरुक राहून करत राहिलात की तुमच्यामधील शक्तीच कार्यशील बनेल, मग साक्षात्कार देण्याची तुमची क्षमता, इतरांचे व आपल्या देशासमोरचे प्रश्न सोडवण्याची शक्ति खऱ्या अर्थाने प्रगट होईल. अशा तऱ्हेने वाईट परिस्थिति बरोबर सामना करणारे वीरपुरुष तुम्ही बनले पाहिजे, तरच सुधारणा होईल. नुसते परमचैतन्यावर सर्व कांही सोपवून चालणार नाहीं. कारण परमचैतन्य तुमच्यामधूनच कार्य करणार आहे. तुम्ही फक्त त्याचे हुकूम पाळणारे सैनिक आहांत; म्हणून काय होणार, कधी होणार, कसे होणार इ. चा विचार करुं नका. स्वत:मधील व इतरांमधील अज्ञान दूर करणे एवढेच तुमचे काम आहे. या बाबतीत लक्षांत ठेवायची गोष्ट म्हणजे तुमच्यासारख्या सैनिकांचा अहंकारच तुमच्या आड येतो आणि मन-बुध्दीतून येणारे विचार अडथळे निर्माण करतात; त्यामुळे तुमचा आत्मविश्वास कमी पडतो. किंवा कधी कधी लोकांना जागृतीची अनुभूति मिळण्यामधें त्यांच्या आज्ञा चक्रावरचा त्रास आड येतो; या आज्ञाचक्रातून पार होण्याचा हा लहानसा टप्पा अवघडच आहे; त्यामुळेही तुम्हाला यश मिळण्याची खात्री नसते. अशा वेळीच तुम्ही आत्मपरीक्षण करणे फार चांगले व ते केलेच पाहिजे. कारण आपण सर्व बरोबर करत आहोत अशा भ्रमात राहण्याची शक्यता असते व त्यासाठी आपले कुठे चुकले हे आत्मपरीक्षणातूनच लक्षात येते. कांही सहजयोगी सहजयोगाच्या कार्यातही सतत पुढें येण्याची धडपड करत असतात; लोकांच्या लक्षांत आपले कार्य यावे ही इच्छा जर त्याच्यामागे असली तर ते चुकीचे आहे. स्वत:च्या उन्नतीमधील प्रगतीसाठी आपण काय करुं शकतो इकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या आंतमधे काय व कां आहे हे पाहण्याचा उद्देश आत्मपरीक्षणामधूनच साध्य होतो. मग आपन स्वत:ला व इतरांनाही किती मदत करुं शकतो हे तुम्हाला समजेल. जी इमारत मजबूत पायांवर बांधली आहे तिला भूकंप झाला तरी धक्का लागत नाहीं पण जी भुसभुसशीत पायावर बांधलेली असते ती कोसळते तसे हे आहे.म्हणून सहजयोगाचा पाया मजबूत ठेवणें इकडे प्रत्येक सह्जयोग्याने काळजीपूर्वक पाहिले पाहिजे.

कधी कधी कांही सहजयोगी माझ्याकडे दुसऱ्या योग्यांबद्दल तक्रारी आणतात; मग 'त्यांना भेटायची माझी इच्छा आहे' असे मी म्हटल्यावर 'त्यांना ओळखणे तुम्हाला सहज शक्य आहे' असे

म्हणतात. मग मला म्हणावे लागते की 'मला सगळेच ठाऊक आहे पण तुम्ही पण सर्व माहिती घेणे व त्यावर उपाय करणे हे मला महत्वाचे वाटते' दुसऱ्याचे दोष काढणे सोपे आहे पण स्वत:मधील दोष स्वत:च ओळखणे व ते सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणें याला जास्त महत्व आहे कारण त्यांतूनच तुमची चेतना सुधारत असते. आजचा दिवस दिवाळी साजरी करण्याचाच आहे कारण एक महान कार्य घटित झाले आहे. दिवाळीचा सण आनंददायक आहेच पण तो आनंद स्वत:पाशीच न राहता तुम्हाला तो जगभर वाटायचा आहे. म्हणून जगांतील सर्व लोकांपर्यंत आपल्याला सहजयोग पसरवायचा आहे. एरवी सर्वजण संसार, नोकरी,पैसा, यासाठी धडपडत असतात पण त्याचबरोबर दुसऱ्यासाठी काय करता येईल हेहि तुम्ही पहायला हवे. अशाच लोकांचा सहजयोगाला उपयोग आहे कारण त्यांच्याजवळ अनुकंपा, करुणा असते व तेच इतरांसाठी कांही करु शकतात. यांतून मोठे समाधान व आनंद मिळणार आहे. दिवा जसा इतरांना प्रकाश देण्यासाठी जळत असतो तसे हे आहे; दिव्याकडून आपण हेच शिकायचे आहे की आपल्याला प्राप्त झालेल्या जाणीवेच्या उच्च स्तरामुळे आपणही कांही तरी केलेच पाहिजे. त्यातच आनंद आहे.

हे सर्व घडणार आहे याची मला खात्री आहे. मीसुध्दा हा प्रकाश कमजोर न होता प्रखर होईल म्हणून धडपडत आहे. पण माझ्या तळमळीपेक्षां तुम्ही स्वतः हा प्रकाश सामावून घेण्यासाठी पुढे आले पाहिजे. माझ्या इच्छेपेक्षा तुमचा स्वत:चा उत्साह असला की तुम्हाला हे नक्की जमेल. स्वत:च्या व्यक्तिमत्वामधील गुणदोष स्वत:च नीट समजून घेण्यासाठी तुम्ही स्वत:कडे पूर्ण अलिप्तपणे पाहणे फार जरुरीचे आहे, त्याशिवाय आपण कुठें चुकतो हे तुमच्या लक्षांत येणार नाही. आणि त्याशिवाय तुमची प्रगति होणार नाहीं, जगांत सगळीकडे शांति प्रस्थापित करणें हे आपले ध्येय आहे. स्वत:मधें परिवर्तन घडवायचे ही मोठी गोष्ट आहेच; पण तसेच परिवर्तन दुसऱ्यांमधेही घडल्याशिवय जगातील आजचे प्रश्न सुटणार नाहींत. जगातील सर्व लोक सहजयोगी झाले तर हेच जग किती सुंदर होईल याची कल्पना करा. तेच माझे स्वप्न आहे. त्यासाठी सर्व तऱ्हेचे उपाय व मार्ग आपण वापरले पाहिजेत. मग एक दिवस असा येईल की तुम्हीच म्हणाल-माताजी, आतां आम्ही अगदी निर्धास्त झालो आहोत- म्हणून आता भूतकाळाचा किंवा पूर्वीच्या अडचणींचा विचार करुं नका, स्वत: आनंद मिळवा, स्वत:बद्दल आत्मविश्वास बाळगा आणि कार्याला लागा. प्रत्येक वेळीं समोरच्या व्यक्तीमधे परिवर्तन कसे करता येईल याचाच विचार करा. नुकतेच मी विमानप्रवासाहून विमानतळावर आले तेव्हां तेथील सहजयोगी नसलेलेही अनेकजण तुमच्यासारखे माझ्याकडे हात करुन उभे होते, त्यांना चैतन्य वगैरे कांहींच माहित नव्हते तरीही हातांवर थंडावा जाणवल्याचे त्यांनी सांगितले. याचाच अर्थ हाच की त्यांना साक्षत्कार हवा होता फक्त आपल्या मदतीची जरुर होती. म्हणून दुसऱ्यांमधील दोषांमुळें न चिडता त्यांना तुमची प्रेमशक्ति जाणवू द्या; मग तुम्हालाच आश्चर्य वाटेल की तुमच्याकडून साक्षात्कार मिळवण्याबद्दलच ते जास्त उत्सुक आहेत. कारण कृत्रिम जीवनाला ते कंटाळले आहेत. मग त्यांच्याबरोबर दिवाळी साजरी करताना तुम्हाला जास्त आनंद मिळेल. दिवाळीत जसे अनेक दिवे पाजळले जातात तसे तुमच्यामधें आलेला प्रकाश अनेकजणांना तुम्हाला प्राप्त करुन द्यायचा आहे आणि हेच तुमचे काम आहे. ते करण्याची शक्ति पण तुमच्याजवळ आहे. म्हणूनच मी पुन्हा पुन्हा आत्मपरीक्षण करत चला असे सांगत असते; तुमच्यामधे आलेल्या प्रकाशाची तुम्हीच काळजी घ्यायची आहे.

सध्याचा काळ विशेष असा आहे. कालच तुम्ही आकाशांतून तारकांचा वर्षाव झालेला पाहिला. त्याचा अर्थ हाच आहे की निसर्गसुध्दा ते जाणतो. मला येणाऱ्या पत्रांपैकी बरीचशी पत्रे नातेवाईकांचे आजार, पति-पत्नीमधील बेबनाव इ. फालतू गोष्टींबद्दलच असतात. खरं म्हणजे असले प्रश्न त्यांनी स्वत:च सोडवले पाहिजेत. पत्र लिहायचे असेल तर आपण कसे व किती कार्य केले, काय साध्य केले, खेड्यापाड्यांत सहजयोग कसा पसरवला, प्रेमाचे वातावरण कसे निर्माण झाले अशा कांही विषयांवर लिहा. सहजयोगांत आल्यावर वैयक्तिक नाती संपतात कारण सर्व सहजयोगी तुमचे भाऊ-बहीण होतात. कांही लोक आपल्या घरांतील

गंभीर आजार असलेल्या नातलगांना बरे करण्याच्या मागे लागतात; त्यांना वाटते की हा बरा झाला तर आजूबाजूचे लोक ते बघून सहजयोगांत येतील. पण हे बरोबर नाहीं; मला कुणाला दुखवायचे नाहीं पण तुमचा आत्मविश्वास, जाण व सूज्ञता बळकट करण्यासाठी ही उदाहरणे सांगितली. आपण कशासाठी सहजयोगात आलो हे प्रथम लक्षांत घ्या; इतर गोष्टींच्या मागें न लागता स्वत:कडे, गहनता मिळवण्याकडे लक्ष द्या. स्वत:चा आदर राखून नातलगांच्या, त्यांचे आजार बरे करण्याच्या मागें लागण्यांत वेळ दवडू नका. आपण फार महत्वाच्या, खास कार्यासाठी सहजयोगांत आलो आहोत याचे भान राखण्यांतच सूज्ञता आहे. तसेच पति-पत्नीच्या भांडणामधें मी लक्ष घालणार नाहीं कारण सहजविवाहाची मी कुणावर सक्ति करत नाही. शिवाय जे लोक सहजयोगांत नाहींत -सहजयोग्यांचे नातेवाईक असले तरी-त्यांच्याशी माझे कांही देणे-घेणे नाहीं; तुम्ही फार तर त्यांना सहजयोगांत कसे आणता येईल एवढाच विचार करा. अशा गोष्टींमधें शक्ति व वेळ खर्च करण्यामुळे तुमचे चित्त बिघडते. आधीच जगांत फार थोडे सहजयोगी आहेत म्हणून सहजयोग पसरवण्याच्या महत्वाच्या कार्याकडे लक्ष द्या. सहजयोग्यांसाठी व सहजयोगात येण्यासाठी उत्सुक असलेल्यांसाठी तुमची शक्ति व वेळ उपयोगांत आणली पाहिजे; नवीन लोकांना सहजयोगांत स्थिरावण्यासाठी तुम्ही मदत केली पाहिजे. सहजयोग सामूहिकतेमधेंच कार्यान्वित होत असतो व प्रत्येक सहजयोगी हा परमेश्वराच्या कार्याचे फक्त माध्यम असतो. त्या दृष्टीने एकमेकांत व नवीन लोकांबद्दल कसलाही भेदभाव वा संकोच न राहता एकोप्याने वागले पाहिजे व ही सामूहिकता दृष्टीस आली पाहिजे.

सध्याचा काळ तुम्हाला खात्रीने यश देणार आहे. म्हणूनच प्रत्येकाने खबरदारी घेऊन, दोष-चुका काढण्याच्या फंदात न पडता, एकत्र येऊन मिळुन-मिसळून कार्य केले पाहिजे. त्याशिवाय कार्य होणार नाहीं. त्यासाठीं आपल्याला अजून मोठ्या संख्येने सहजयोगी हवे आहेत. म्हणून एकमेकांच्या विचारानें, काय-कसे-कुठे कार्य करता येईल याच्याबद्दल सामूहिक पध्दतीनें कार्य होणे आवश्यक आहे; मग त्यांत यश तुमचेच आहे. आपल्यापैकी कुणीही ख्रिश्चन, मुसलमान अशा वेगवेगळ्या धर्माच्या व पंथाच्या भावना बाळगून चालणार नाही; सहजयोगी हीच सर्वांची जात व धर्म असतो. मी बरेच मुस्लिम लोक सहजयोगांत आलेले बघते पण त्यातले फारच थोडे खऱ्या अर्थानें सहजयोगी बनतात; ते येतात, माझी प्रवचने ऐकतात, पण त्यातले फारच थोडे खऱ्या अर्थानें सहजयोगी बनत नहींत. ते झाले की तुम्ही 'डोळस' बनता व आपल्या समाजामधील, धर्मामधील सर्व दोष समजून घेऊ शकता व लोकांना सुधारु शकता. पण त्याचबरोबर हे प्रेमभावनेतून झाले तर फायदा होतो, नाहीं तर तुम्ही त्यांना सोडून जाता. आजच्या दिवाळीमधून तुम्ही हेच समजून घ्यायचे आहे की तुम्हाला मिळालेला प्रकाश तेजस्वी बनवून तुम्हाला तो सगळीकडे पसरवायचा आहे. ते करतानाही सूज्ञता विसरुन, घर-दार सोडले, आई-वडिलांचे नाते तोडले इ. अतिरेक करुनही चालणार नाही. तुम्ही अर्धे-कच्चे सहजयोगी बनलात तर कांही उपयोग नाहीं. तशा अर्धवट सहजयोग्यांना चिकटून राहणेही चांगले नाहीं. सहजयोगी हे एक विशेष व्यक्तिमत्व असते जो सत्याबरोबर एकनिष्ठ असतो. तसे तुम्ही झालांत की सगळीकडे दिवाळीचे दिवे उजळणार आहेत. या दिवाळीच्या शुभदिवशी मी तुम्हा सर्वांना आशीर्वाद देते. तुम्ही स्वत:चा आत्मसन्मान राखा आणि सहजयोगांत आपण का आलोत व आपली जबाबदारी काय आहे हे समजून घ्या. तुमचे चित्त इतर फालतू गोष्टींमधून बाहेर खेचून स्वत:कडे वळवा. म्हणजे तुम्हाला मिळालेली शक्ति जोमाने कार्यान्वित होईल. पुढच्या दिवाळीपर्यंत परिस्थिति खूप बदलणार आहे याची मला खात्री आहे. आपल्याला परमात्म्याचे शुभाशीर्वाद आहेत; सर्वांनी सामूहिकतेमधून समजूतदारपणें व जबाबदारीने कार्य करण्याच्या मागें लागा.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

●●●

## श्रीमाताजींचा हॉगकॉंग दौरा (वृत्तांत)

सहज समाचार

प.पू.श्रीमाताजींनी गेल्या डिसेंबरमधे ता. १६ पासून चार दिवस गेल्या होत्या. विमान तळावर तेथील सहजयोग्यांनी उत्साहाने स्वागत केले; व त्यांची रहाण्या-जेवणापासूनची सर्व व्यवस्था आत्मीयतेने व समर्पित भावनेनें आणि सन्मानपूर्वक केली होती. श्रीमाताजी खूप प्रसन्न झाल्या.

पहिले दोन दिवस कांही कार्यक्रम ठेवले नव्हते; तरीही श्रीमाताजी अमेरिकेंतील सध्याच्या दहशतवाद्यांच्या प्रश्नामुळे सतत समाचार-वार्ता ऐकण्यांत व्यस्त होत्या व त्याबद्दलच चर्चा करत होत्या ओसामा -बिन-लादेन पकडला जाणे अवघड असल्याचेही त्यांनी सांगितले. इस्लाम मधिल -वहाबी-पंथाचे लोक फार कट्टरवादी आहेत; त्यांनी मुलांना शाळेपासूनच वैरभावनाच शिकवला व इस्लाम धर्माच्या नांवाखाली श्री बुश यांच्याबरोबरच्या पत्र-व्यवहाराबद्दलही श्रीमाताजींनी स्पष्टीकरण केले व त्याच्याकडून या सैतानी शक्तींचा परिपात करवण्यात येईल असे आग्रहाने स्पष्ट केले.

अठरा तारखेला त्यांनी सहजयोग्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी बरेच चिनमधिल योगी पण हजर होते. चीनमधील पुरातन -ताओ- शिकवण म्हणजे सहजयोगच आहे आणि आतां त्याचे पुनुरुज्जीवन व्हायला हवे असे सांगुन त्या म्हणाल्या, -चिनी लोक मुळचे नम्र स्वभावाचेच आहेत आणि आदरपुर्वक वागतात. त्यांच्या महिलापरीषदेला पण मी गेले होते व त्यांनी मला सन्मानही दिला व खूप आस्थेवाईकपणे मला वागणूक दिली... इथेही तुम्ही सहजयोगाचे चांगले कार्य करत आहात. तुमच्यातील काही लोक सहजामधुन बाहेर गेले ते त्यांच्या मूर्खपणामुळे. तुम्ही सहजस्त्रोतापासुन अलग राहुन काही करु शकणार नाही कारण स्त्रोताबरोबरचा संबंध तुटल्यावर तुमची वाढ होऊ शकत नाही... अमेरीकेच्या अध्यक्षांनाही मी हे समजावले आहे व द्वीधा मनःस्थितीतून पार पदण्यासाठी अध्यात्मिक शक्ति आहे हे त्यांना कळले आहे. अलिकडेच मी अमेरिकेल्ल गेले होते तेव्हा त्यांनी माझ्या सुरक्षेची खास व्यवस्था केली होती..... आफ्रिकेमधील आयव्हरी कोस्ट या पुर्वी फ्रेंच अधिपत्याखालील प्रदेशांत धर्मांतर करून मुस्लिम झालेले खूप लोक आहेत व तेथे आता २०,००० सहजयोगी आहेत. म्हणून सहजयोग कार्यान्वित होण्यासाठी सध्याच काळ फार चांगला आहे व सत्याच्या शोधांत असणाऱ्या सर्व लोकांना तुम्ही मदत केली पाहीजे. नायजेरिया सारख्या प्रदेशांतही सहजयोग चांगला रूजला अहे.... प्रत्येक धर्मात विकृत व असत्य गोष्टी घुसवल्यामुळे अनेक पंथ निर्माण झाले व आतां त्यांच्यांत युध्द माजुन अनेक बळी पडत आहेत. सहजयोगात मुलतत्ववाद चालत नाही; प्रत्येकजण स्वतंत्र आहे आणि कुंण्डलिनी जागृती नंतर तुम्ही चुकिच्या गोष्टिंकडे वळणारच नाही. सहजयोग सोडून दिलेले लोकही परत येणार आहेत... सर्व सधु-संतांनी आत्मस्वरूप जाणण्याचा उपदेश केला, मी फक्त सामुहिक परिमाण दिले आहे.... तुम्ही सुध्दा दुसऱ्याना सतत, प्रत्येक प्रसंगात सांगत राहीले पाहिजे. त्याला नाक मुरडणाऱ्या लोकांकडे दुर्लक्ष करा. चीनमधेही कार्य करण्यावर प्राधान्य द्या.....

**वर्धा जिल्हा :** वर्धा सहजयोग केंद्रा तर्फे नवरात्रामध्ये दुर्गा देवीच्या परीसरात रामचरण मर्केटच्या गच्चीवर सहजयोग ध्यानधारणा व आत्मसाक्षातकाराचा कर्यक्रम घेण्यात अला. त्याकाळात एकंदर २,१६७ लोकांनी आत्मसाक्षातकार घेतला. तसेच वर्षभरात साधारण १५ मोठे पब्लिक प्रोग्राम घेण्यात आले, तसेच मागील दोन वर्षात साधारण ८,००० लोकांना घरोघरी जाउन त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेउन सहजयोग सांगण्यात आला. पुढील वर्षात अजुन मोठ्या प्रमाणात कार्यक्रम घेण्याचा मानस आहे.

**अहमदनगर जिल्हा :** प. पू. श्री माताजींच्या कृपेत नगर जिल्ह्या मधे सन २००१ मधे अनेक प्रोग्राम घेण्यात आले. प्रा. अशोक चव्हाण व त्यांचे सहकारी यांच्या परीश्रमाने ज्याठिकाणी सहजयोगाचा प्रसार नव्हता अशा ठिकाणी नविन केंद्र सुरु करण्यात आली. सहजयोगाबाबत सतत वर्तमान पत्रात माहिती प्रसिध्द होत होती. त्यातील श्रीरामपुर केंद्रातर्फे ५७ ठिकाणी सार्वजनिक प्रोग्राम झाले. अहमदनगर जिल्ह्यात सध्या ९३ साप्ताहीक ध्यान केंद्रे आहेत. पुढील वर्षात १०० हुन अधीक ध्यान केंद्रे सुरु करण्याचा संकल्प आहे.

राहुरी शहरामध्ये २९ जानेवारी २००२ रोजी प्रगती विद्यालय या ठिकाणी सायंकाळी ६ ते ८ या वेळात पब्लिक प्रोग्राम घेण्यात आला त्याला सुमारे ८०० लोक उपस्थीत होते. त्यानंतर दोन दिवस फॉलोआप प्रोग्राम घेण्यात आले.

आडर गांव, ता. राहुरी २५ जाने. पुत्रदा एकादशीच्या दिवशी मकरसंक्रांति निमित्त हळदि-कुंकु समारंभ सयंकाळी ३ ते ६ या वेळात आयोजीत केला होता त्यावेळी सह्जयोगाचा पब्लिकप्रोग्राम घेण्यात आला त्याला सुमारे २०० महिला उपस्थित होत्या. तसेच २७ तारखेला दुध व्यवसाय मार्गदर्शना निमित्त सहजयोगाचा प्रोग्राम आयोजित केला होता.

**सांगली जिल्हा :** प. पू. श्री माताजींच्या कृपेत २८ जानेवारी रोजी मिरज येथे आदर्श मंगल कार्यालयात दिवसभर सहजयोगाचे प्रदर्शन आयोजीत केले होते. त्यामध्ये प्रामुख्याने सह्जयोग हा सर्व धर्माचा सार असुन, आध्यात्मिक दृष्ट्या सर्वांचा अत्मा एकच आहे हे सांगणारे चार्ट व फोटो ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनाचा आजूबाजूच्या भागातील लोकांनी लाभ घेतला. हे प्रदर्शन झाल्यावर मिरज येथे दर शुक्रवारी सा. ७ वा मल्लिकार्जुन मंदिर सोमवार पेठ येथे ध्यान केद्र सुरु झाले आहे.

**जुन्नर व नारायणगांव :** १८ जानेवारी २००२ रोजी वारुळ वाडी, नारायण गांव येथे महिलांसाठी हळदी-कुंकु व तिळगुळ समारंभ आयोजीत केला होता. त्या वेळी १६०-१७० महिलांना जागृति देण्यात आली. आता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वारुळ वाडी येथे दर रविवारी स. १० वा. नविन सेंटर भरते.

२२ जानेवारी २००२ पुणे-नाशिक रोड वरील नारायणगांव पासुन ८ की. मी. अंतरावर असलेले १४ नंबर याठिकाणी हळदी-कुंकु व तिळगुळ समारंभ आयोजित केला होता त्या वेळी साधारण ६५ ते ७५ महिलांनी जागृति घेतली. आता तेथे दर शुक्रवारी सा. ६ ते ७ या वेळात जि. प. प्राथमिक शाळेत नविन केंद्र भरते.

२ फेब्रुवारी रोजी नारायण गांव येथे दिवसभर सहजयोगाचे प्रदर्शन आयोजीत केले होते. त्यावेळी दिवसभरात ६५०-७०० लोकांनी प्रदर्शन पाहुन जागृति घेतली.

रविवार दि. ३ फेब्रुवारी रोजी जुन्नर येथिल राजमाता जिजाऊ सभागृह पंचायत समिती येथे सहजयोग प्रदर्शन व जागृतिचा प्रोग्राम आयोजीत केला होता. त्या वेळी तिळगुळ व हळदि-कुंकु समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी दिवसभरात सुमारे ११०० लोकांनी जागृती घेतली.

## सहजयोग केंन्द्र पुणे तर्फे आयोजित केलेले पब्लिक प्रोग्राम्स

| अ. क्र. | दिनांक | ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| १. | ६.१.२००२ | फातिमा नगर, हडपसर जवळ | सायं. ५ ते ९ |
| २. | १३.१.२००२ | राजेंद्रनगर वसंतराव वैद्य विद्यालय | सका. ८ ते ९ |
| ३. | | उत्सव सभागृह कोथरूड | सका. १० ते सायं. ७ |
| ४. | | मुकुंदनगर, झांबरे हॉल | सका. १० ते सायं. ७ |
| ५. | १४.१.२००२ | गणेश मंदीर, महेश सोसा., बिबवेवाडी | सका. ९ ते सायं. ८ |
| ६. | १८.१.२००२ | लोणी काळभोर येथील शाळा | सका. ११ वा. |
| ७. | २०.१.२००२ | लोणी काळभोर गांव | सायं. ७:३० वा. |
| ८. | | कवठे गांव, ता. वाई | सायं. ६:३० वा. |
| ९. | २६.१.२००२ | इंदापुर गांव | सायं. ६ वा. |
| १०. | | रुई गांव, इंदापुर गांव | सका. ११ वा. |
| ११. | २७.१.२००२ | लोकमान्य नगर वसाहत हॉल | सका. ७ ते ८ |
| १२. | | भिगवण गांव | सायं. ५ वा. |
| १३. | | कळस गांव, इंदापुर | सायं. ६ वा. |
| १४. | | अलंकार पोलिसचौकी, कर्वेनगर, पुणे | सायं. ७ वा. |
| १५. | ३१.१.२००२ | गणेश मंदीर, कोथरुड | सायं. ४ वा. |
| १६. | ०१.२.२००२ | बिबवेवाडी अप्पर | सायं. ४ वा. |
| १७. | | आनंद नगर, सिंहगड रोड | सायं. ५ वा. |
| १८. | ०३.२.२००२ | कै. यशवंतराव चव्हाण उद्यान, शिवदर्शन | सका. ७.३० वा. |
| १९. | | किलबील शाळा सभागृह, माणिकबाग | सायं. ५ ते ९ |
| २०. | | कदम प्लाझा, धनकवडी | दु. १ वा. |
| २१. | ०५.२.२००२ | आधार मुक-बधिर शाळा, अप्पर इंदीरानगर | सका. १० ते ८ |
| २२. | ०८.२.२००२ | राजा मंत्री उद्यान, नळस्टॉप जवळ | सका. ६.४५ |
| २३. | ०९.२.२००२ | दौण्ड गांव | सका. १० ते सायं ९ |
| २४. | | एस. एस. पी. एम. एस. ईंजिनियरींग कॉलेज | सका. ११ वा. |
| २५. | १०.२.२००२ | महेश सोसायटी, बिबवेवाडी | दु. १ ते सायं ८ |
| २६. | | क्विन्स मेरी टेकनिकल इन्स्टिट्युट, खडकी | सका. १० ते सायं. ८ |
| २७. | १७.२.२००२ | मृत्युंजय मंदिर कोथरुड | सायं. ५ ते ८ |
| २८. | | ब्लाइंड स्कुल, कोरेगांव पार्क | दु. १२ वा. |
| २९. | १८.२.२००२ | महाराष्ट्रराज्य उद्योजगता केंद्र, जे. पी. नाईक संस्था, कोथरुड | सायं. ४ वा. |
| ३०. | २४.२.२००२ | बागुल उद्यान, शिवदर्शन | सका. ७ वा. |
| | २५.२.२००२ | भारती विहार, धनकवडी | सयं. ७ वा. |
| ३१. | २८.२.२००२ | महाराणाप्रताप उद्यान, बाजीराव रोड | साका. ७ वा. |
| ३२. | ०३.३.२००२ | दशभुजा गणेश मंदिर, कोथरुड | सका. १० ते सायं. ८ |
| | | पर्वती रमाणा गणपती मंदीर | सका. १० ते सायं. ८ |

शिव पुजा : श्री शिव छत्रपती क्रीडा नगरी, बालेवाडी, पुणे दिनांक १५, १६ व १७ मार्च २००२

बर्थ डे पुजा : निर्मल धाम, गुडगांव, दिल्ली, दिनांक २१, २२, २३ मार्च २००२

पब्लिक प्रोग्राम : दिल्ली, २४ मार्च २००२



गणपतीपुळे २००१



कळवा २००१



पुणे, फेब्रुवारी २००२



ख्रिसमस पुजा, गणपतीपुळे २००१



गौरी पुजन, गणपतीपुळे २००१















